गुरुवार, २२ जून २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२७९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●THURSDAY 22 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-279 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11%
व्याजदर
* नियम व अटी लागू

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स


चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :

मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803

अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.

नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला

टोल-फ्री : 18004197501 | rajasthanimultistate.in
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177

# मला मुक्त करा : अजित पवार



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मला विरोधी पक्षनेत्यामध्ये फार काही इंटरेस्ट नव्हता. पण आमदारांनी आग्रह केला. त्यांनी सह्या केल्या. नेतेमंडळींनी देखील सांगितले की तू विरोधी पक्षनेता हो. त्यामुळे मी त्यांच्याखातर या पदाची जबाबदारी घेतली. मी एक वर्ष विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी सांभाळली आहे. ते सांभाळत असताना काहींचे म्हणणे आहे की, तू कडक वागत नाहीस. आता त्यांची गचांडी धरु का? पण आता बस झाले, मला त्यातून मुक्त करा आणि संघटनेची जबाबदारी द्या. मग कशापद्धतीने पक्ष चालतो ते बघा, असे म्हणत अजित पवार यांनी पक्षाच्या बैठकीत बोलताना मन मोकळे केले.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या पार पडलेल्या कार्यक्रमात खासदार सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांना पक्षाच्या कार्यकारी अध्यक्षपदाची जबाबदारी दिली. शरद पवार यांनी याबाबत कार्यक्रमात घोषणा केलेली. शरद पवार यांनी त्यावेळी अनेक नेत्यांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपवल्या. पण या नेत्यांमध्ये राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांचे नाव नव्हते. त्यामुळे अजित पवार नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. दुसरीकडे अजित पवार यांच्याकडे विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी असल्याने त्यांना पक्षाची संघटनात्मक जबाबदारी देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. आता अजित पवार यांनी याबाबतची मागणी केली आहे. यावेळी पुढे बोलताना अजित पवार म्हणाले की, मी आज माझी इच्छा व्यक्त केली आहे. मला संघटनेत कोणतंही पद द्या. तुम्हाला जे पद योग्य वाटेल ते द्या. त्या पदाला योग्य न्याय मिळवून देईन, असे अजित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मुंबईत आज कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी त्यांनी आपल्याला विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी नको. तर पक्षाच्या संघटनात्मक बांधणी विषयी जबाबदारी द्या. आपल्याला कोणतीही जबाबदारी मिळाली तरी आपण तिला न्याय देण्याचा प्रयत्न करु, असे अजित पवार भर कार्यक्रमात म्हणाले आहेत.

## चर्चेतली बातमी

### कुपोषण निर्मुलन ‘टास्क फोर्स’ अध्यक्षपदी सावंत

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** राज्यात कुपोषणाला आळा घालण्यासाठी, तसेच बालमृत्यू, मातामृत्यूंचे प्रमाण कमी व्हावे, या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या ‘टास्क फोर्स’च्या अध्यक्षपदी माजी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली असून या ‘टास्क फोर्स’मध्ये महिला बाल विकास, आरोग्य, आदिवासी, कृषी, अन्न व नागरी पुरवठा विभागांचे अप्पर सचिव, सचिव, प्रधान सचिव, आयुक्त यांचा समावेश आहे. राज्याचे माजी आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांच्या राज्याच्या कुपोषण निर्मुलनातील उल्लेखनीय योगदान लक्षात घेऊन त्यांची राज्याच्या कुपोषण निर्मुलन टास्क फोर्सच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. भाजपा-शिवसेना युती सरकारच्या काळात डॉ. दीपक सावंत हे आरोग्यमंत्री होते.

## २५ लाखांचा गंडा घातला

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** व्यापाऱ्याला स्वस्तात सोने देतो असे सांगून २५ लाखाचा गंडा घातल्याचा प्रकार फळमार्केट येथे घडला. यावेळी सोन्याचा व्यवहार होत असताना भामट्यातीलच दोघांना पोलीस असल्याचे भासवून या टोळीने पलायन केले. पुण्याचे व्यापारी मयूर जैन याला स्वस्तात सोने देतो असे सांगून हा व्यवहार पूर्ण करण्यासाठी मार्केटमध्ये बोलावण्यात आले. स्वस्तातील सोने खरेदी करण्यासाठी जैन हे मित्र सचिन काळभोर, सुनील चव्हाण व हर्षद वेदमुथा यांच्यासमवेत आले होते. यावेळी संशयित अशोक रेड्डी यांने सोन्याचे बिस्किट दाखवून विश्वासही संपादन केला. यावेळी संशयितांनी मोटारीतून सोने देत असल्याचे सांगत असतानाच दोन साथीदार पोलीस असल्याचे सांगत रोकड घेऊन पोबारा केला.

## वारकऱ्यांना आता शासनातर्फे विमा संरक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी शासनातर्फे विमा संरक्षण देणारी विठ्ठल रुक्मिणी वारकरी विमा छत्र योजना लागू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. लाखो वारकऱ्यांना यामुळे शासनाच्या खर्चाने विमा संरक्षण मिळणार आहे. वारीच्या ३० दिवसांसाठी हे विमा संरक्षण असेल.
यामध्ये एखाद्या वारकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांस ५ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येईल. दुर्घटनेत कायमचे अपंगत्व किंवा विकलांगता आल्यास १ लाख रुपये देण्यात येतील. अंशतः अपंगत्व आल्यास ५० हजार रुपये तसेच वारीच्या दरम्यान आजारी पडल्यास औषधोपचारासाठी ३५ हजार रुपयापर्यंतचा खर्च मिळेल. याबाबत शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला असून मदत व पुनर्वसन विभागामार्फत ही योजना राबविण्यात येईल.
वारीच्या दरम्यान अपघात किंवा दुर्घटना होतात आणि त्यात वारकरी जखमी होतात किंवा त्यांचा दुर्दैवी मृत्यू होतो. यामध्ये त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत



मिळावी या उद्देशाने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी हा निर्णय घेतला आहे.

# सिंचन जलसंपन्नतेसाठी उपमुख्यमंत्र्यांनी दिला कोट्यवधींचा निधी

## आमदार डॉ. संजय कुटे : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जळगाव जामोद मतदारसंघासाठी भगीरथ

आधुनिक केसरी न्यूज

**जळगांव जा :** जळगाव जामोद मतदारसंघाचे आमदार डॉ.




संजय कुटे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घनिष्ठमैत्री सर्वश्रुत आहे. उपमुख्यमंत्री तथा राज्याचे जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दि.१९जून रोजी झालेल्या जनसंपदा विभागाच्या नियामक मंडळाच्या ८३ व्या बैठकीत जिगाव सिंचन प्रकल्प, भोंन ता. संग्रामपुर येथील प्राचीन संस्कृती संवर्धन व जतन, दादूलगाव निर्वाळा, जिगाव सौर प्रकल्प, आर कचेरी, आलेवाडी, चोंडी,कुऱ्हा- वदोडा अशा विवि प्रकल्प अशा विविध महत्त्वकांक्षी प्रयत्नांना प्रकल्पांना आमदार डॉ. संजय कुटे यांच्या सातत्याच्या पाठपुराव्यामुळे हजारो कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जळगाव जामोद मतदारसंघात साठी भगीरथ ठरले असून एवढा भरून निधी यापूर्वी कधीही मिळाला नव्हता. ह्या मतदारसंघाकडे विशेष लक्ष देत एवढा निधी सिंचनासाठी, जलसंपन्न करण्यासाठी एवढा भरभक्कम निधी त्यांनी दिल्यामुळे ह्या विभागाचे आमदार डॉ.संजय कुटे यांनी एका पत्रकार परिषदेमध्ये त्यांचे आणि शासनाची प्रति आभार व्यक्त केले. चोंडी सिंचन प्रकल्पातून ह्या वर्षीच्या रब्बी हंगामासाठी पाणी उपलब्ध होईल तसेच २०२४ मध्ये पहिल्या टप्प्यासाठी जिगावचे पाणी अडवल्या जाईल.उपसा सिंचन,अर कचेरी प्रकल्प, आलेवाडी प्रकल्प हे सुद्धा असा भरपूर निधी निरंतर उपलब्ध झाल्यास लवकरच मार्गी लावून आपला परिसर सिंचनाच्या बाबतीत जलसंपन्न होईल असे सुद्धा यावेळी आ. संजय कुटे यांनी नमूद केले.भोंन चयस जागतिक स्तराच्या पर्यटन केंद्रासाठी ५८०कोटी रुपये मंजूर झाले असून एक सुंदर असे जागतिक पर्यटन केंद्र लवकरच विकसित होईल. दि. १९ जून ३ रोजी झालेल्या नियामक मंडळा च्या ८३ व्या बैठकीत जिगांव प्रकल्पा संबंधीत सर्व विषयां करीता आ. डॉ. संजय कुटे यांच्या विशेष प्रयत्न व सततच्या पाठपुराव्यामुळे मंजुरात मिळालेली आहे. तसेच विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपुर चे कार्यकारी संचालक राजेंद्र कुमार मोहीते जलसंपदा विभाग प्रादेशिक कार्यालय अमरावती चे मुख्य अभियंता शजगतटाले, बुलडाणा पाटबंचारे प्रकल्प मंडळाचे अधिक्षक अभियंता सुनिल चौधरी, जिगाव उपसासिंचन विभाग, श्री विजय हजारे कार्यकारी अभियंता धरण व पुनर्वसन विभाग शेगाव, खामगाव चे कार्यकारी अभियंता परमजीतसिंग जुनेजा तसेच जलविद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता अजित सोळंके यांच्या अथक परिश्रमाने विधानसभा मतदारसंघातील सर्व सिंचन प्रकल्पाचे प्रश्न मार्गी लागून मतदार संघ सिंचनाच्या बाबतीत सुजलाम सुफलाम करण्याचीकरामत संजय कुटे यांनीकायम ठेवली आहे.

**दादुलगावचे संदर्भ इतर गावांना लागू होतील :** मधल्या



काळात महाविकास आघाडीचे सरकार होते, त्या काळात शेतकऱ्यांच्या आक्षेपाला केराच्या टोपल्या दाखविण्यात आल्या . आपण स्वत : जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलने केली, रात्र रात्रभर महा मुक्काम आंदोलने केली ,तरी सुद्धा काही उपयोग झाला नाही . महाविकास आघाडीचा अडीच वर्षाचा काळ हा जिगाव प्रकल्पग्रस्तांसाठी फार नुकसानीचा काळ होता . दादुलगाव चा कलम ड नुसार झालेल्या निरवाळ्यानंतर २२ कोटी रुपये आजच्या बैठकीत मंजूर करण्यात आले . काही गावे याबाबत कोर्टात गेलेली आहेत . आता दादुलगाव चा संदर्भ देऊन इतर गावांना सुद्धा भरघोस निधी प्राप्त होईल असा विश्वास ह्यावेळी आमदार डॉ .संजय कुटे यांनी व्यक्त केला .

# उगवतीचे रंग




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## तुम पुकार लो...


आधुनिक केसरी

त्यातून त्या बाहेर पडतील की नाही आणि बाहेर पडल्या तरी पुन्हा पूर्वीसारखे गाऊ शकतील की नाही अशी भीती स्वतः लतादीदींसह सर्वांच्याच मनात होती. निर्मात्यांचे चित्रपट लतादीदींच्या गाण्यांआभावी रखडले होते. लतादीदींनी स्वतःशी गाऊन पाहिले. सूर तर चांगला लागत होता. पण चित्रपटगीत रेकॉर्ड होताना तो तसाच लागेल का, आपल्याला पुन्हा गाता येईल अशा अनेक शंका दीदींच्या मनात होत्या. अशा सुमारास हेमंतदा लतादीदींच्या घरी गेले. त्यांनी दीदींना धीर दिला आणि तुम्ही पुन्हा पहिल्यासारख्या गाऊ शकाल अशी हिंमत दिली. एवढेच नव्हे तर माईंना सांगीतले, ' मी दीदींना माझ्यासोबत स्टुडिओत घेऊन जातो आणि मी स्वतःच त्यांना परत घेऊन येईन. तुम्ही कोणतीही काळजी करू नका. ' हेमंतदा दीदींना आपल्यासोबत घेऊन गेले. त्यांनी दीदींना गायला सांगितलं. दीदी नेहमीप्रमाणे गायल्या. मग त्या म्हणाल्या, ' आता करायचं का गाणं रेकॉर्ड ? ' हेमंतदा म्हणाले, ' गाणं तर केव्हाच रेकॉर्ड झालंय दीदी. ' ते गीत होतं बीस साल बाद या चित्रपटातलं. ' कहीं दीप जले कहीं दिल...' हे गीत प्रचंड लोकप्रिय झालं. लतादीदींना आपला हरवलेला आत्मविश्वास मिळवून देण्यासाठी हेमंतदानी अशा प्रकारे मदत केली. १९४७ च्या सुमारास हेमंतदाना उत्तम ब्रेक मिळाला. बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या कादंबरीवर ' आनंदमठ ' या चित्रपटाची निर्मिती झाली. या चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी हेमंतदांवर सोपवली होती. हेमंतदांनी या संधीचे सोने केले. या चित्रपटातील 'वंदे मातरम ' हे लतादीदींच्या आवाजातील गीत कमालीचे लोकप्रिय झाले. आजही हे गीत विशेष प्रसंगी खास म्हणून गायलं जातं. अंगावर रोमांच उभे करण्याची ताकद या गीतात आहे. गुरुदत्तनिर्मित ' जाल ' चित्रपटातील ' ये रात, ये चांदनी फिर कहाँ ..' हे त्यांचं गीत लोकप्रिय झालं. सोपवली. नंतर गुरुदत्त यांचा ' प्यासा ' चित्रपट आला. या चित्रपटातील त्यांनी गायिलेले ' जाने वो कैसे लोग थे जिनके प्यार को प्यार मिला ' हे गीत रसिकांच्या ओठांवर खेळू लागले. ' नागीन ' चित्रपटातील गाणी कमालीची लोकप्रिय झाली. त्यातील ' तन डोले मेरा मन डोले ...' या गाण्यातील पुंगीचा आवाज रसिकांचे मन मोहून गेला. पण खरं तर हा पुंगीचा आवाज नव्हता. ही हेमंतदांनी लढवलेली एक क्लुप्ती होती. त्यांच्या प्रतिभेचा एक अनोखा अविष्कार होता. क्ले व्हायोलिन वाजवणारे संगीतकार कल्याणजी आणि हार्मोनियमाच्या सुरांचे जादूगार मास्टर रवी यांच्याकडून त्यांनी ही संगीताची धून तयार करून घेतली होती.





## आनंदी पहाट



## व्यक्तीची ओळख तिच्या विचारांवरून होते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी एक हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अनेकदा आपले मन जुने

सोडायला, विसरायला तयार नसते, तसेच ते नव्याची नवलाई देखील अनुभवू पाहत असते. खरे तर, इथेच आपल्यातील निवड कौशल्याचे कसब दिसून येत असते. आपले अंतर्मन सौदर्याच्या संकल्पनांना नवी दिशा मिळवून देण्याच्या प्रयत्नात असते. नवे काहीतरी हवे असे म्हणणारे एक मन एका दिशेने, तर जुने ते सोने म्हणणारे दुसरे मन त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने विचार करत असते. असे जरी असले तरीही, प्रयोगशील मनाला नावीन्याची अनुभूति हवी असते, मग ते नव्याचाच अंगीकार करते. अगदी प्राचीन काळापासून आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसे विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्ररंभापुरते निमित्तच ठरत असते. आयुष्याच्या प्रवासात सोबत हवी असते, ती विचारांचीच.



आधुनिक केसरी

### सुखाचा विसावा | हरिपाठ ||

नाही ओळखला | विकारांचा मारा ||
पापाचा पसारा | भोवताली ||१||
क्षणिक सुखाला | भाळला हा जीव ||
मृगजळी ठाव | नाही कोठे ||२||
संसाराचा भार | थकलो वाहून ||
गर्दभा समान | वाया गेला ||३||
ज्ञाना-तुका सांगे | मायेचा पसारा ||
अंतरी मोगरा | गंधाळला ||४||
आता तरी थोडा | जाग माझ्या जीवा ||
सुखाचा विसावा | हरिपाठ ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**वरदां शुभदां शिवां सर्वदां सुखदां शुभाम्|
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| २६ || वर देणाऱ्या, शुभ फल देणाऱ्या, शिवेला सर्वादेला, सुखदेला, शुभेला, तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**बिनु जाने दुख देतु है, जानें करे सहाय ।
महिमा सन्त गृहस्थ की, जो जाने सो पाय
।।२३।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/२३ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** अज्ञानी जीवांना ही माया दुःख देते आणि ज्ञानी संतजनांची सहाय्यता करते. जे अध्यात्म विद्येच्या या तत्वज्ञानाला जाणून मायेमध्ये राहूनही त्यापासून असंग असतात, त्या गृहस्थ संतांची महिमा महान आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## काव्य-चरितावली



पुष्प ३१वे

आधुनिक केसरी



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

**करितो श्रीसद्गुरूंना वंदन
प्रभू श्रीरामाचे वंदू या चरण
श्रीराम जय राम जय जय राम
ओठी असो नाम श्रीराम श्रीराम ।।१ ।।**


**इंदूरपर्यंत भ्रमंतीत श्रीमहाराजांना
घर सोडून वर्षे आठ होऊन गेली
माय गीताबाई उदास राहिली
रावजींची शोधा शोध व्यर्थ गेली ।।२ ।।**

**गणू सारखा मुलगा गुणवान
घर सोडुनी कुठे असेल गेला ?
आमचा गणू कुठे दिसला का ?
प्रश्न रावजीनी रोज विचारला ।।३ ।।**

**आठवणीने मायबाप दुःखी झाले
क्षणा क्षणा गणुस आठवू लागले
मोठा साधू होऊन गणू भेटेल ही
आशेने मोठ्या ते वाट पाहु लागले ।।४ ।।
म्हणे अरुणदास- सांगेन,पुढे काय घडे...**

## मी फक्त एका नामातच आहे

आधुनिक केसरी



मनुष्य कितीही मोठा असला, उत्तम पुराण आणि प्रवचन सांगणारा जरी असला, तरी तो जर नामात रहात नसेल, किंवा त्याच्या संगतीत परमेश्वराचे प्रेम लागत नसेल, तर तो कदापीही संत म्हणून समजला जाणार नाही. संतांचे नातेवाईक संत असतातच असे नव्हे. आपण नोकरी केली तर आपला मुलगा नोकरी करीलच असे काही नाही; तसेच जो भगवंताचा आहे त्याचा मुलगा भगवंताचा असेलच असे नाही. संत जरी झाला तरी त्याने चार माणसांसारखेच वागावे. काहीतरी वागणे हे संतांचे वागणे नव्हे. अत्यंत निर्भयता हा संतांचा पहिला गुण होय; कारण 'सर्व ठिकाणी मी आहे' ही भावना झाल्यावर भयाचे कारणच उरत नाही. साधूच्या अंतःकरणामध्ये भयाचा संकल्प नसल्यामुळे वाघ, सिंह, साप त्याला त्रास देत नाहीत. अगदे जंगली वाघाकडे देखील निर्भयतेने नजरानजर केली तर तो अंगावर येत नाही; शिवाय, साधूंच्या शुद्ध अंतःकरणाचाही त्याच्यावर परिणाम होतो. अशा रीतीने, संतांच्या अंतःकरणाची प्राणिमात्रांनासुद्धा जाणीव असते. अशा संतांचा सहवास मिळणे ही फार भाग्याची गोष्ट आहे. परमेश्वराचे प्रेम लागणे किंवा सतत मुखात नाम येणे, हेच संतांच्या संगतीत राहून साधायचे असते. संतांची अखंड संगत नामानेच ठेवता येईल. जिथे नाम आहे तिथे संतांचा सहवास आहे. तुकाराम महाराजांसारखे संतसुद्धा देवापाशी मागताना 'तुझा विसर न पडावा' हेच मागतात. तसेच रामदासस्वामी देवाला म्हणतात, 'तुझा योग, म्हणजे सहवास, मला नित्य घडू दे.' 'योग असणे' म्हणजे दुसरे काही नसून, मन जेव्हा अनुसंधानापासून अलिप्त होऊन इतर विचारांत भरकटते, तेव्हा त्याला आवरून परत अनुसंधानात लावणे, हीच योगशक्ति. हुकूम कितीही कडक असेना का, परंतु त्याच्याखाली जर सही नसेल तर त्या हुकुमाला महत्त्व नाही. साहेबाच्या सहीच्या कागदाला महत्त्व आहे. नाम हे सर्व साधनांत सहीसारखे आहे. एका मुलाला अत्यंत राग येत असे. रागाच्या भरात तो आपले डोके आपटून घेई. त्याला मी सांगितले, 'रोज स्नान झाल्यावर आपल्या पोटावर गंधाने रामनाम लिहून ठेव, आणि ज्या ज्या वेळी राग येईल त्या त्या वेळी त्या नामाकडे पहा !' आणि त्या प्रयोगाने त्या मुलाचा राग आपोआप शांत झाला. खरोखर, नामात किती प्रचंड शक्ति आहे ! अनुभव घेऊनच पहा. मी आजपर्यंत सर्वांना नामच सांगत आलो आहे. मी इथे नाही, मी तिथे नाही, मी गेलो नाही, मी जात नाही; मी फक्त एका नामातच आहे. ज्याच्याजवळ भगवंताचे नाम आहे, त्याच्या मागे-पुढे मी आहेच. **तुम्ही भगवंताचे नाम घ्यावे ह्यापलीकडे, सत्य सांगतो , मला कसलीही अपेक्षा नाही . ।। श्री राम जय राम जय जय राम ।।**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

स्पृशन्नपि गजो हन्ति जिघ्रन्नपि भुजङ्गमः ।
हसन्नपि नृपो हन्ति मानयन्नपि दुर्जनः ॥

स्पष्टीकरण - या श्लोकाचा मुख्य रोख आहे तो असा - राजा (सत्ताधारी) आणि दुर्जन यांच्याशी फार लगट करू नये. त्यांचे बोलणे आणि करणे या दोन गोष्टीत तफावत असते. आपण मात्र विश्वास धरून चालतो. पण असा विश्वास धरू नये.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी


विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, २२ जून २०२३




**के.सी.आर. बिपरजॉय नागपुरात भाजपाच्या गडावर**

पान ६



**मंदिरात वस्त्रसंहिता का आवश्यक ?**

पान ७





# नैसर्गिक व विषमुक्त शेतीसाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा

## कृषीभूषण अजय जाधव: स्व.मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमाला उत्साहात


आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे योगा दिनी महाराष्ट्र पत्रकार संघ, मुंबई आणि शिवाजी महाविद्यालय, कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे अकरावे पुष्प गुंफताना कृषिभूषण अजय जाधव म्हणाले की, 'आज हवा, पाणी, माती आणि अन्न हे सर्व विषयुक्त झाले असून हे विषमुक्त झाले नाही तर येणाऱ्या काळात मानसिक व शारीरिक आजाराचे प्रमाण प्रचंड वाढेल. येणाऱ्या नवजात व तरुण मुलांमध्ये अनेक आजार आणि विकार बळावतील. आरोग्याचा प्रश्न भीषण बनेल, अनेक मल्टिनॅशनल कंपन्या मोठ्या प्रमाणावर रासायनिक खते, बी - बियाणे आणि औषधे वापरण्याचे सल्ले देतात, संबंधित वस्तू तेच उत्पादित करतात. यामागे शाश्वत व नैसगिक शेती नष्ट करण्याचे मोठे जागतिक षडयंत्र आहे. हे ओळखून नैसर्गिक व विष मुक्त शेती करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन त्यांनी केले.

तर अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले यांनी योगाचे व व्यायामाचे प्रात्यक्षिकांसह मानवी जीवनातील महत्त्व विषद केले. योग भारतीय संस्कृतीचा सर्वात मोठा जागतिक ठेवा असून मानवी जीवनात सुख, मनशांती योगामुळेच शक्य आहे. योगामध्ये एवढी शक्ती आहे की, तुम्ही अनेक संकटावर मात करू शकता. तसेच अनेक आजारही समुळ नष्ट होतात. सकारात्मक ऊर्जा दिवसभर कार्यरत राहते. तेव्हा आपण शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी रोज स्वतःसाठी किमान एक तास द्यावा, तरुणांनी फास्ट फूड आणि व्यसनांच्या आहारी न जाता बलशाली व्हावे, तरुण बलशाली झाला तरच देश बलशाली होईल, असे प्रतिपादन त्यांनी केले. याप्रसंगी प्रास्ताविक दै. आधुनिक केसरीचे संपादक तथा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांनी केले, सुत्रसंचलन डॉ. प्रकाश खेत्री तर आभार क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उदय डोंगरे यांनी मानले. दै. आधुनिक केसरीचे व्यवस्थापक संजय व्यापारी, जाहीरात प्रमुख संदीप घंटे, एन. सी. सी.चे प्रमुख डॉ. राकेश अहिरराव तसेच एन.सी. सी.चे विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आता प्रत्येक ट्रकमध्ये एसी बसवणे बंधनकारक

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** देशातील ट्रक चालकांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्रीय रस्ते, वाहतूक व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी मोठी घोषणा केली आहे. यानुसार आता देशातील प्रत्येक ट्रकमध्ये चालकाच्या केबिनमध्ये एसी बसवणे बंधनकारक करण्यात येणार आहे. २०२५ पासून हा निर्णय लागू होणार आहे. नितीन गडकरींनी हा नियम लागू करण्याच्या प्रस्तावावर स्वाक्षरी केली आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाहन उद्योगाला या नियमानुसार बदल करण्यासाठी १८ महिन्यांचा वेळ आवश्यक आहे. रस्ते, वाहतूक मंत्रालयाने पहिल्यांदा २०१६ मध्ये याबाबतचा प्रस्ताव आणला होता. नितीन गडकरी म्हणाले, आपल्या देशात काही चालक १२ ते १४ तास गाडी चालवतात. इतर देशांमध्ये बस आणि ट्रक चालकांच्या कामाचे तास निश्चित करण्यात आले आहेत. आपल्या देशात चालक ४३ ते ४७ अंश सेल्सियस तापमानात गाडी चालवतात. यावरून आपण आपल्याकडील चालकांच्या परिस्थितीचा अंदाज लावू शकतो. मी जेव्हा मंत्री झालो तेव्हाच मी ट्रकमध्ये एसी केबिन सुरू करण्यास इच्छूक होतो. मात्र, काही लोकांनी यामुळे खर्च वाढेल असं म्हणत याला विरोध केला. मात्र, आज ( १९ जून ) मी या निर्णयाच्या फाईलवर स्वाक्षरी केली आहे, असेही नितीन गडकरींनी नमूद केले.

नितीन गडकरी यांच्या या निर्णयानंतर भर उन्हात उष्णतेचा मारा सहन करत १२ ते १४ तास ट्रक चालवणाऱ्या ट्रक चालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयावर मागील अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. गाडी चालवण्याची कठीण परिस्थिती आणि रस्त्यांची



अवस्था यामुळे तासंतास ट्रक चालवणारे चालक थकून जातात. याच कारणाने अनेक अपघातही होतात. म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचे नितीन गडकरींनी सांगितले आहे. दरम्यान, वॉल्व्हो सारख्या ट्रक उत्पादक जागतिक कंपन्या आधीपासून आपल्या ट्रकमध्ये एसी केबिन उपलब्ध करून देतात. आता भारतातील कंपन्यांनाही २०२५ पासून प्रत्येक ट्रकमध्ये एसी केबिन देणं बंधनकारक होणार आहे.

# साताऱ्यात उदयनराजे व शिवेंद्रराजे भोसले कार्यकर्त्यांमध्ये राडा

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा :** खा.उदयनराजे भोसले आणि आ. शिवेंद्रराजे भोसले यांच्यातील वाद जगजाहीर आहे. दोघांकडून सातत्याने एकमेकांना लक्ष्य केले जाते. बुधवारी सकाळीच या दोघांमधल्या वादाचे असेच एक रुप साताऱ्याच्या खिंदवाडी गावात पाहायला मिळाले. एका जमिनीच्या तुकड्यावरून हे दोघे आमने-सामने आले. त्यानंतर दोघांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा वाद झाला. अखेर पोलिसांना मध्यस्थी करून हा वाद मिटवावा लागला. पण नेमका वाद काय होता ? याबाबत दोघांनीही माध्यमांशी बोलताना भूमिका स्पष्ट केली आहे. साताऱ्यातल्या खिंदवाडी भागात आज सकाळी उदयनराजे आणि शिवेंद्रराजेंचे समर्थक एकमेकांना भिडले. निमित्त होते एका कंटेनरचे! कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजाराच्या उभारणीची तयारी आज शिवेंद्रराजेंकडून करण्यात आली. त्यासाठी रीतसर भूमीपूजन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले. त्यासाठी या जागेवर एक कंटेनर तात्पुरतं कार्यालय म्हणून उभा करण्यात आला होता. पण काही वेळातच सकाळी ९ च्या सुमारास उदयनराजेंचे कार्यकर्ते त्या ठिकाणी पोहोचले आणि त्यांनी कंटेनर जेसीबीच्या मदतीने उलटा केला. यानंतर या दोघांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. दोन्ही बाजूंनी आक्रमकपणे भूमिका मांडण्यात आली. शेवटी पोलिसांनी मध्यस्थी करून जमावाला पांगवलं. या सर्व प्रकारावर उदयनराजे आणि शिवेंद्रराजेंनी माध्यमांशी बोलताना भूमिका स्पष्ट केली आहे. सदर जागा आपल्याच मालकीची असल्याचा दावा उदयनराजे भोसलेंनी केला आहे. ती जागा माझ्या मालकीची आहे. तिथे हे सगळे अल्पभूधारक लोक कोण आहेत ? ते जवळपास सात-आठ वर्षं आर्मीमध्ये होते. आज तुम्ही तिथे येऊन दगड ठेवणार, नारळ फोडणार, फटाके फोडणार ? या प्रकरणात न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. उद्या उपमुख्यमंत्री इथे येणार आहेत. त्यांच्यासमोर ही मांडणी करणार आहोत, अशी प्रतिक्रिया उदयनराजे भोसले यांनी दिली.

# राजूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथे गणपत दादा इंग्लिश स्कूल आणिआर्ट ऑफ लिव्हिंग जालना यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सहा दिवसीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. योग शिक्षकाने साधकांस विविध योग प्रात्यक्षिके करून दाखवत योगाचे महत्व पटवून दिले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रारंभ झालेल्या शिबिरातून साधक आनंद अनुभूती घेत आहेत. राजूर येथे गणपत दादा इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून पुढील सहा दिवस नागरिकांसाठी मोफत योग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रोज सकाळी पाच ते सात या वेळेत हे शिबीर चालणार



आहे. योग शिबिराच्या माध्यमातून योग, ध्यान, प्राणायाम, सुदर्शन क्रिया, खेळ, सूर्यनमस्कार यांसारख्या यौगिक क्रिया करून घेतल्या जात आहेत. यावेळी योग शिक्षक राहुल जोशी यांनी शिबिरार्थीकडून विविध प्रात्यक्षिके करून घेतली आणि मानवी जीवनात उत्तम आरोग्यासाठी योग किती महत्त्वाचे आहे हे पटवून दिले. तणावमुक्त जीवनासाठी नियमित व्यायाम व योग साधना करावी असेही जोशी म्हणाले. शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मेस्टा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, आर्ट ऑफलिव्हिंगचे स्वयंसेवक उद्धव फुंदे , प्रा.बाळासाहेब बोराडे, शिवाजी बांदल, समाधान माळी, भगवान सुद्रिक, डॉ.सुदर्शन थोटे, डॉ. ईश्वर जटाळे,सीमा शर्मा आदी व्यक्ती परिश्रम घेत आहेत.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू विदर्भ दौऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विदर्भ दौरा करण्याचे पक्के केले आहे. त्या दृष्टीने प्रशासन कामाला लागले आहे. राष्ट्रपती मुर्मू यांना गतवर्षी निमंत्रण मिळाले होते. येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाने हे निमंत्रण दिले होते. त्याचा स्वीकार केल्याचे पत्र अखेर पोहोचले. आज एक वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात त्या अनुषंगाने बैठक झाली. त्यात राष्ट्रपतींच्या संभाव्य आगमनाबाबत चर्चा झाल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले. हिंदी विद्यापीठात दीक्षांत सोहळ्यास उपस्थिती व भव्य सभागृहाचे लोकार्पण असे कार्यक्रम होतील व त्यानंतर सेवाग्राम आश्रम भेट असे तीन कार्यक्रम सहा जुलैला होणार आहे. राष्ट्रपतींचे आगमन गडचिरोली येथील समारंभ आटोपून हेलिकॉप्टरने वर्धेत होणार. तर वर्धेतील कार्यक्रम आटोपल्यानंतर त्या नागपूरला जाणार आहेत.

# भाजपा आमदारांची खंत

आधुनिक केसरी

मणिपूरमध्ये भाजपाचे सरकार बहुमतात आहे. दीड महिन्यांपासून राज्यात सुरू असलेल्या हिंसाचार रोखण्यात भाजपा सरकारला अपयश आले आहे. या पार्श्वभूमीवर मैतेई समाजाचे नऊ आमदार त्यातही भाजपाचे आठ आणि मणिपूर सरकारला पाठिंबा देणाऱ्या एका अपक्ष आमदाराने पंतप्रधान कार्यालयाला भेट देऊन सामान्य जनतेचा विद्यमान भाजपा सरकारवरील विश्वास उडाला असल्याचे निवेदन सोमवारी सादर केले. पंतप्रधान कार्यालयाला निवेदन देत असताना त्याच दिवशी राज्यातील इतर ३० आमदारांनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली. या तीस आमदारांमध्ये एनपीपी आणि जेडीयू पक्षाचा प्रत्येकी एक आमदार होता. या दोन वेगवेगळ्या शिष्टमंडळाबाबत बोलताना निशिकांत सिंह सपम यांनी 'द इंडियन एक्स्प्रेस'शी बोलताना सांगितले की, भाजपामध्ये कोणतेही गटतट नसून आमचा पक्ष एकसंध आहे. विसंवाद झाल्यामुळे दोन वेगवेगळी शिष्टमंडळे आली. राज्यात चाललेल्या हिंसाचारामुळे १०० हून अधिक निरपराध लोकांचे बळी गेले आहेत आणि लोकांच्या संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले, तरी प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताच सुधार झालेला नाही. राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे, असे निवेदन पंतप्रधान कार्यालयाला देण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक समुदायाच्या माणसाला शांतता हवी आहे, असे सांगताना या निवेदनात पुढे म्हटले, "सध्या लोकांचा विद्यमान सरकार आणि प्रशासनावर विश्वास नाही. विद्यमान सरकारने लोकांचा विश्वास गमावला आहे. प्रशासनाने काही विशेष उपाययोजना राबवल्या आणि सरकारने कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले तरच सामान्य लोकांचा विश्वास आणि आत्मविश्वास आपण परत मिळवू शकू. पंतप्रधान कार्यालयात गेलेल्या शिष्टमंडळाच्या शिफारशीनुसार कुकी आणि मैतेई समुदायाच्या आमदारांची बैठक होण्याची शक्यता आहे. या बैठकीत परस्पर संवाद साधून आणि विचारांची देवाणघेवाण करून राज्यातील सद्यःस्थितीवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केले जाण्याची शक्यता आहे. दुसरी शिफारस अशी की, स्थानिक पोलिसांसह केंद्रीय निमलष्करी दलाला तैनात करून कुकी अतिरेकी संघटनांवर सस्पेन्शन ऑफ ऑपरेशन्सच्या अंतर्गत कारवाई करावी. तसेच राज्यातील घुसखोरीवर कडक शासन करावे आणि चिनकुकी संरक्षण दलाचा सध्याच्या हिंसाचारात सहभाग असून त्यांच्यावरही कडक कारवाई करावी. त्याचबरोबर वेगळ्या प्रशासनाची मागणी कोणत्याही समुदायाने (कुकी-झोमी समुदायाने अशी मागणी केली आहे) केली असली तरी ती कोणत्याही परिस्थितीत मान्य करू नये, असे शिष्टमंडळाने सांगितले.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# नवीन कारागृह उभारण्याची गरज

आधुनिक केसरी

**राज्यातील कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्याने राज्यात नवीन कारागृह उभारण्याची गरज निर्माण झाली आहे. कैद्यांच्या वाढत्या संख्येमुळे कारागृह यंत्रणेवर ताण पडत आहे. कारागृहात शिक्षा न झालेल्या कैद्यांची (न्यायाधीन बंदी) संख्या वाढत आहे. राज्यातील सर्व ६० कारागृहांमध्ये २४ हजार ७२२ कैदी ठेवण्याची क्षमता आहे. प्रत्यक्षात राज्यातील विविध कारागृहांत ४१ हजार १९१ कैदी आहेत. त्यांपैकी ७० टक्के कच्चे कैदी आहेत. कारागृहाची क्षमता विस्तारित करणे, तसेच कारागृहांची संख्या वाढवणे हेच पर्याय कारागृह प्रशासनाकडे उरले आहेत.**

दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या कैद्यांच्या संख्येमुळे नवीन कारागृह निर्माण करण्याची गरज आहे. मुंबईत ऑर्थर रोड आणि भायखळा कारागृह ही दोन कारागृहे आहेत. या कारागृहात सध्या क्षमतेपेक्षा जास्त कैदी आहेत. भायखळा येथील कारागृहाची ८०० कैद्यांची क्षमता आहे. मात्र प्रत्यक्षात या ठिकाणी ३ हजार ५०० च्या आसपास कैदी आहेत. हीच अवस्था ऑर्थर रोड कारागृहाची आहे. या ठिकाणी ८०० कैद्यांची क्षमता असताना येथे देखील ३ हजार पेक्षा जास्त कैदी आहेत. याचा विचार करून मुंबई शहरात नवीन कारागृह बांधण्याची गरज आहे.

राज्यातील कारागृह कैद्यांनी तुडुंब भरले असून कैदी ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. राज्यातील काही मध्यवर्ती व काही जिल्हा कारागृहांत तर दुप्पट कैदी ठेवले जात आहेत. विशेष म्हणजे महिला कारागृहांत महिला कैदीसुद्धा क्षमतेपेक्षा अधिक ठेवले जात असल्याचे कारागृहाकडून मिळालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे नवीन कारागृह सुरू करणे ही काळाची गरज आहे तसेच कारागृहांची क्षमता वाढविण्याठी मोठ्या प्रमाणात उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

पुरुष कैद्यांप्रमाणेच महिलांसाठीच्या कारागृहातही क्षमतेपेक्षा जास्त महिला कैद्यांना ठेवण्यात आले आहे. नुकत्याच प्रकाशित झालेल्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातून (एनसीआरबी) महाराष्ट्रातील महिला कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त महिला कैदी असल्याची माहिती उजेडात आली आहे. उत्तराखंड, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर, झारखंड या सहा राज्यांतील कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त महिला कैदी असल्याचे निरीक्षण राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या अहवालात नोंदविण्यात आले आहे.

महाराष्ट्रात येरवडा, मुंबई आणि अकोला येथे महिलांसाठी स्वतंत्र कारागृहे आहेत. राज्यात ३१ जिल्हा कारागृहे आहेत. एक खुली वसाहत आहे. १४२ उपकारागृहे आहेत. राज्यातील कारागृहात ४ हजार ७२५ शिक्षा झालेले पुरुष कैदी आहेत आणि ३० हजार १२५ कच्चे कैदी आहेत. महिलांसाठी असलेल्या स्वतंत्र कारागृहांत १३४३ कैदी आहेत. त्यांपैकी वीस टक्के महिला कैद्यांना शिक्षा झालेली आहे. उर्वरित महिला कैद्यांना अद्याप शिक्षा झालेली नाही. तीन कारागृहांत १३२० महिला कैद्यांना ठेवण्याची क्षमता आहे

राज्य 'कारागृह अहवाल २०१६-१७'मध्ये कैद्यांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. राज्यात ५४ कारागृह आहेत. त्यापैकी ९ मध्यवर्ती कारागृह, ३३ जिल्हा करागृह, १३ खुले कारागृह आहेत. राज्यातील



कारागृहांत कैदी ठेवण्याची क्षमता ही २३ हजार ९९२ एवढी आहे. मात्र, प्रत्यक्षात राज्यातील कारागृहांत ३१ हजार २१४ कैदी ठेवण्यात आले आहेत. यामध्ये पुरुष कैद्यांची क्षमता २२ हजार ६९१ असताना प्रत्यक्षात कारागृहांमध्ये २९ हजार ८०२ कैदी ठेवण्यात आले आहेत. राज्यातील कारागृहांमध्ये महिला कैद्यांची क्षमता ही १२५१ असताना १४१२ महिला कैदी कारागृहांत आहेत. सध्या राज्यातील कारागृहांत क्षमतेपेक्षा सात हजार कैदी जास्त असल्याचे समोर आले आहे.

राज्यातील कारागृहांमध्ये कैद्यांच्या क्षमतेचा विचार केल्यास येरवडा, मुंबई, ठाणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, तळोजा, कोल्हापूर, नाशिक रोड या नऊ मध्यवर्ती कारागृहात क्षमतेपेक्षा सर्वाधिक कैदी ठेवले जात असल्याचे समोर आले आहे. नऊ मध्यवर्ती कारागृहाची क्षमता ही १४ हजार ८४१ आहे. मात्र, सध्या या ठिकाणी २२ हजार ४६ कैदी ठेवण्यात आले आहेत. येरवडा कारागृहाची क्षमता २ हजार ४४९ असताना त्या ठिकाणी चार हजार ५५० कैदी ठेवले जात आहेत. तर, मुंबई मध्यवर्ती कारागृहाची क्षमता आठशे असताना त्या ठिकाणी तब्बल २ हजार ८८४ एवढे कैदी आहेत. औरंगाबाद, तळोजा आणि नाशिक रोड कारागृहामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवण्यात आले आहेत. तसेच, काही जिल्हा कारागृहाची हीच परिस्थिती आहे. त्यामुळे कारागृहाची संख्या व क्षमता वाढविण्याची गरज आहे. अलिकडे काही कारागृहात बराकी बांधण्याचे काम सुरू आहे. पण, त्या बराकी कैद्यांसाठी पुरेशा नाही. नवीन कारागृह उभारण्याची गरज निर्माण झाली आहे.

गंभीर गुन्ह्यात पकडलेल्या आरोपींना न्यायालयाच्या आदेशाने कारागृहात ठेवण्यात येते. त्यांना कच्चे कैदी असे म्हटले जाते. जामीन मिळेपर्यंत कैद्यांना कारागृहात ठेवण्यात येते. गंभीर गुन्ह्यांमध्ये पकडलेल्या आरोपींना न्यायालयात सुनावणीसाठी हजर करण्याबरोबरच सुनावणी प्रक्रिया पार पाडून त्यांना जामीन मंजूर होईपर्यंतचे सर्व कायदेशीर सोपस्कार पार पाडावे लागत असल्याने त्याचा ताण पोलीस, न्यायव्यवस्था आणि कारागृह प्रशासनावर पडत आहे. देशातील बहुतांश कारागृहांत क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवण्यात आले आहेत. महिला आणि पुरुष कैद्यांच्या संख्येचा विचार केल्यास सर्वाधिक कैदी शिक्षा न झालेले आहेत. कारागृहात ठेवण्यात आलेल्या एकूण कैद्यांची संख्या विचारात घेतल्यास ७५ ते ८० टक्के कैदी शिक्षा न झालेले आहेत. शिक्षा झालेल्या कैद्यांचे प्रमाण २० ते २५ टक्के एवढेच आहे.



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# ताजमहाल निर्मितीस तेवीस साल!

आधुनिक केसरी

**आपल्या अत्यंत प्रीय बेगमच्या मृत्युपश्चात शहांजहाँ शोकसागरात बुडाला होता. असे देखील म्हंटले जाते, की मुमताज बेगमच्या मृत्युनंतर तो तब्बल २ वर्ष शोकमग्न होता. या दरम्यान आपल्या रंगीन आवडी निवडींकरता प्रसिद्ध असलेल्या शहांजहाँने आपल्या आवडी निवडी बाजुला सारल्या होत्या. या काळात त्याने कोणताही शाही लिबास परिधान केला नाही किंवा कोणत्याही शाही कार्यक्रमात उपस्थित देखील राहिला नाही. मुमताज महलच्या मृत्युनंतर शहांजहाँने आपल्या प्रेमाचे अमर प्रतिक म्हणून तिच्या स्मरणार्थ आग्रा येथे ताजमहालाची निर्मीती केली. ताजमहल आपल्या भव्यदिव्यतेमुळे आणि आकर्षक कलाकृतीमुळे जगातील सात आश्चर्यांपैकी एक गणला जातो. याच्या निर्मीतीकरता तब्बल तेवीस वर्षांचा अवधी लागला.**

आज भारतीय आणि विदेशी पर्यटकांचे हे मुख्य आकर्षण केंद्र ठरले आहे. मोगल शासक शहाजहाँची सर्वात आवडती राणी म्हणजे मुमताज महल होय. तीच्या आठवणीत उत्तर प्रदेशातील आग्रा येथे बांधण्यात आलेली सुंदर वास्तू आहे. जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेल्या ताजमहाल या भव्यदिव्य अशा वास्तुरचनेमुळे आजही ती कुण्याच्याही विस्मरणात गेलेली नाही. तिच्या अलौकिक सौंदर्याने शहाजहाँ मोहित झाला नसता, तर नवलच! तिला त्याने आपली सगळ्यात आवडती बेगम म्हणुन दर्जा दिला होता. इतकेच नव्हें तर त्याने अनेक कवींना देखील मुमताजच्या सौंदर्यावर अनेक काव्य लिहीण्याकरता प्रेरित केले होते. मुमताज महल ही अत्यंत करूणा आणि नम्र हृदयाची धनी म्हणून ओळखली जायची. गरजवंतांच्या आणि अनाथ लोकांच्या मदतीकरता ती सतत तत्पर असायची. सौंदर्यसम्राज्ञी तर ती होतीच, त्याशिवाय बुद्धीमान देखील होती. शहाजहाँच्या राज्यकारभाराशी संबंधीत घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमध्ये ती मोलाची मदत करत होती. इ.स.१५९३ला एप्रील महिन्यात मुमताज महलचा जन्म उत्तर प्रदेशातील आग्रा येथे झाला. तिचे मुळनाव अर्जुमंद बानो बेगम असे होते. तिचे वडिल अब्दुल हसन आसफ खाँ हे मोगल साम्राज्यातील चौथे शासक आणि शहाजहाँचे वडिल जहाँगिर यांचे वजिर म्हणून कार्यरत होते. तसेच मुमताज महलची आत्या नुरजहाँ ही मोगल सम्राट जहाँगिर यांची सर्वात प्रिय बेगम होती. मुमताज महल ऊर्फ अर्जुमंद बानो अतिशय सुंदर आणि गुणवान स्त्री होती. ती हरमजवळ असलेल्या मीना बाजारात काचेचे आणि रेशमाचे मोती विकण्याचे काम करत असे. इ.स.१६०७ तीची भेट- खुर्रम याच बाजारात मोगल वंशाचा शहजादा शहाजहाँशी झाली. त्या सुमारास ती केवळ १४ वर्षाची होती. अगदी तेव्हांपासूनच त्यांच्या ऐतिहासिक प्रेमकथेला सुरूवात झाली. हळुहळू त्यांच्या प्रेमाचे नाते अधिकाधिक घट्ट होत गेले आणि पाच वर्षांनंतर त्यांनी इ.स.१६१२ला निकाह केला. निकाहपश्चात ती शहाजहाँची सर्वात प्रिय आणि आवडती बेगम झाली. तिच्याशिवाय शहाजहाँ एक क्षण देखील राहू शकत नव्हता. मुमताज महलने एकूण १४ अपत्यांना जन्म दिला. ज्यात ८ मुले आणि ६ मुली होत्या. परंतु त्यांची ७ अपत्येच जिवीत राहू शकली. त्यांच्या इतर मुलांचा मृत्यू किशोरावस्थेतच झाला. त्यांच्या अपत्यांमध्ये जहाँआरा बेगम, दाराशिकोह यांचा समावेश आहे. दाराशिकोह त्यांचा सर्वात सभ्य, समंजस व बुध्दीमान पुत्र होता. यालाच आपल्या मृत्युपश्चात आपला उत्तराधिकारी बनविण्याची शहांजहाँची इच्छा होती. पण पुढे त्याला आपल्या लोभी भाऊ- औरंगजेबासमोर पराजय पत्करावा लागला. अर्जुमंद बानोच्या अलौकिक सौंदर्याने शहाजहाँ एवढा फिदा झाला, की त्याने निकाहानंतर तिचे नाव बदलून मुमताज महल असे केले. याशिवाय त्याने मुमताज महलला मलिका- ए- जमानी ही उपाधी देखील प्रदान केली होती. शहाजहाँच्या मुमताज महल व्यतिरीक्त अनेक बेगम होत्या, परंतु त्याच्या राज्यात जो सन्मान आणि मान मुमताज महलला मिळाला तसा अन्य कुणाला देखील प्राप्त झाला नव्हता. इतिहासकारांच्या मते शहाजहाँने मुमताजला आपल्या राज्यकारभाराशी संबंधीत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्याचा अधिकार देखील बहाल केला होता. इतकेच नव्हें तर तिच्या समंतीशिवाय तो कोणतेच फरमान जारी करत नव्हता. त्यांचे उत्कट प्रेम पाहाता, असे देखील म्हंटले गेले, की शहांजहाँला आपल्या बेगमप्रती खुप ओढ आणि प्रेम होते. तो तिच्याशिवाय एक क्षण देखील राहू शकत नव्हता. म्हणून आपल्या राज्यकारभाराशी संबंधीत दौऱ्यांमध्ये सुद्धा तो तिला आपल्या सोबत नेत असे. तसेच आपली सर्वात विश्वासपात्र जोडीदार म्हणून त्याने तिचा गौरव करीत तिच्या सन्मानार्थ आग्रा येथे विशेष महाल, मुहर उजाह, शाही मुहर अशा शब्दांत वाखाणण्याजोग्या भव्यदिव्य महालांची निर्मीती केली होती. मुमताज महलला आपल्या चौदाव्या अपत्याला- गौहर बेगमला जन्म देतांना प्रचंड प्रसववेदनेला सामोरे जावे लागले आणि त्यातच तिचा दि.१७ जून १६३१ रोजी मृत्यू झाला. आपल्या अत्यंत प्रीय बेगमच्या मृत्युपश्चात शहांजहाँ शोकसागरात बुडाला होता. असे देखील म्हंटले जाते, की मुमताज बेगमच्या मृत्युनंतर तो तब्बल २ वर्षे शोकमग्न होता. या दरम्यान आपल्या रंगीन आवडी निवडींकरता प्रसिद्ध असलेल्या शहांजहाँने आपल्या आवडी निवडी बाजूला सारल्या होत्या. या काळात त्याने कोणताही शाही लिबास परिधान केला नाही किं कोणत्याही शाही कार्यक्रमात उपस्थित देखील राहिला नाही. मुमताज महलच्या मृत्युनंतर शहांजहाँने आपल्या प्रेमाचे अमर प्रतिक म्हणून तिच्या स्मरणार्थ आग्रा येथे ताजमहालाची निर्मीती केली. ताजमहल आपल्या भव्यदिव्यतेमुळे आणि आकर्शक कलाकृतीमुळे जगातील सात आश्चर्यांपैकी एक गणला जातो. याच्या निर्मीतीकरता तब्बल तेवीस वर्षांचा अवधी लागला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# यशस्वी व्हायचे असेल तर दररोज योगसाधना करावी : गुरव

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी दररोज योग साधना करावी असे प्रतिपादन शेवगावचे नवनियुक्त तहसीलदार राहुल गुरव साहेब यांनी केले. ते आज आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शेवगाव, प्राथमिक विद्यामंदिर शास्त्रीनगर शेवगाव, निर्मल ब्राईट फ्युचर स्कूल शेवगाव व अहमदनगर जनशक्ती क्रीडा व युवा विकास मंडळ शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक योग दिनानिमित्त कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. योग ही भारत देशाची निशाणी आहे असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य संपतराव दसपुते म्हणाले की भारत ही योगाची जननी आहे. योग म्हणजे जोडणे होय. मन ,बुद्धी ,भावना यांचे मिलन म्हणजे योग होय. योगामुळे आत्मा व शरीर एकमेकांना जोडले जाते. यावेळी जागतिक योग दिनाची पार्श्वभूमी त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. यावेळी योग गुरु शेखर पाटेकर योगा व प्राणायमाचे महत्त्व सांगताना म्हणाले की मन निरोगी, आनंदी, सुदृढ ठेवायचे असेल तर योगासनाला पर्याय नाही. श्वास आणि योग यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. योगामध्ये एकूण ८४ लाख आसने आहेत. आपले आयुष्य वाढवायचे असेल ,आपले शरीर प्रफुल्लित करायचे असेल तर प्राणायाम करा. प्राणायमामुळे मेंदूचा विकास होतो असे ते म्हणाले. यावेळी व्यासपीठावर शेवगावचे नवनियुक्त तहसीलदार राहुल गुरव साहेब, नायब तहसीलदार रविंद्र सानप साहेब, शेवगावच्या दिवाणी न्यायदंडाधिकारी वर्ग- १ मोनाली बेंद्रे,योग गुरु शेखर पाटेकर ,शेवगाव बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. ताठे साहेब. ॲड.श्री. एन. के. गरड, आबासाहेब काकडे विद्यालयाचे प्राचार्य संपतराव दसपुते, निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलचे प्राचार्य शंकर वरखेडकर, प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका परविन पटेल, विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका सौ. मंदाकिनी भालसिंग, उपप्राचार्य रूपा खेडकर, पर्यवेक्षिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक शिवाजी पोटभरे सर्व प्राध्यापक, अध्यापक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह ५०००हून अधिक विद्यार्थ्यांनी योगगुरु शेखर पाटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली योगा व प्राणायाम केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गरड तर आभार कल्पेश भागवत यांनी मांनले.



# रानटी हत्तींचा कळप आता परतीच्या प्रवासाला

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** २६ एप्रिल पासून १५ जूनपर्यंत मलकाझरी येथे वास्तव्याला असलेला रानटी हत्तीचा कळप आता परतीच्या प्रवासाला लागला असून सध्या गेल्या तीन-चार दिवसांपासून इटियाडोह धरण परिसरात त्यांचा मुक्त संचार सुरू आहे. हत्तीच्या दर्शनासाठी पर्यटकांची पावले सध्या इटियाडोह धरणाकडे वळत आहेत.
५ जून रोजी हत्तींचा कळप चुटीया ते झाशीनगर येथील जंगलमार्गे भ्रमंती करत रात्री अंदाजे १२ वाजता तिडका या गावामध्ये पोहोचला. या गावाशेजारी एक वनतलाव आहे. त्या ठिकाणी बराच वेळ थांबला. जेव्हा गावकऱ्यांना हत्तीच्या ओरडण्याचा आवाज आला, तेव्हा गावकरी घाबरून एकमेकांच्या घराच्या छतावर जावून थांबले होते. या दरम्यान हत्तींनी कोणालाही कसलाच त्रास न देता पुढे येरंडी दर्रेच्या जंगलाच्या दिशेने मार्गक्रमण केले. १६ जून रोजी परत सकाळी १० च्या सुमारास हत्तीच्या कळपाचे लोकांना दर्शन झाले. इटियाडोह जलाशयामध्ये हत्तीचा कळप अंघोळ करताना एक किलोमीटर अंतरावरून बऱ्याच नागरिकांनी त्यांना पाहिले. कळप येरंडी जंगलमार्गे इटियाडोह धरणाकडे वळला आहे, अशी माहिती तिडका, येरंडी येथील गावकऱ्यांनी दिली.

राष्ट्रीय उद्यानाचे वनपरिक्षेत्राधिकारी सचिन डोंगरवार यांनी या बाबीला दुजोरा दिला आहे . गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्याच गोंदिया जिल्ह्यात धूमाकुळ घातलेल्या रानटी हत्तींच्या कळपाने अर्जुनी मोरगाव तालुक्यात २६ एप्रिल रोजी पुनरागमन केले होते . मागील वर्षी सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात हा कळप गडचिरोली जिल्ह्यातून गोंदिया जिल्ह्यात दाखल झाला होता . नवेगावबांध वनपरिक्षेत्रांतर्गत कवठा जंगल परिसरात हत्तींनी बस्तान मांडले होते . बोळदे, कावठा, डोंगरगाव, इंजोरी, अरततोंडी, बोरटोला, सिरेगावबांध या गावात हत्तीच्या कळपाने धान व ऊस पिकांचे नुकसान केले होते . ३ ऑक्टोबर २०२२ ला हत्तींच्या कळपाने अर्जुनी मोरगाव तालुक्यातील तिडका येथील एका आदिवासी शेतकऱ्याला ठार केले होते . १२ ऑक्टोबरच्या रात्री नागनडोह येथील आदिवासींच्या वस्तीवर हल्ला करून त्यांच्या घराची व इतर जीवनोपयोगी साहित्याची नासधूस केली होती . त्यामुळे गावातील भयभीत आदिवासी जीव मुठीत घेऊन गाव सोडून पळाले होते .

# कार आतून लॉक झाल्याने मुलांचा गुदमरून मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** कारमध्ये बसण्याच्या मोहापायी तीन चिमुकले कारमध्ये बसले खरे, मात्र नंतर त्यामधून कधीच बाहेर येऊ शकले नाही. कारमध्ये गेल्यानंतर कार आतून लॉक झाली आणि त्या तिन्ही मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या मुलांचा गुदमरून मृत्यू झाल्याचे पोलिसांनी त्यांच्या प्राथमिक अहवालात म्हटले आहे.

नागपूरच्या पाचपावली पोलीस स्टेशन अंतर्गत फारूकनगर परिसरातून शनिवारी दुपारपासून सहा वर्षांची आलिया खान, सहा वर्षांची आफरीन खान आणि चार वर्षांचा तौफिक खान हे तिघे चिमुकले बेपत्ता झाले होते. कुटुंबीयांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवल्यानंतर पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करत तिघांचा युद्ध पातळीवर शोध सुरू केला होता. या परिसरातील सर्व सीसीटीव्ही तपासले, मात्र तिन्ही मुलं फारुख नगर किंवा आजूबाजूच्या वस्तीतील कुठल्याच ठिकाणी दिसून आले नाही. तीनही चिमुकल्यांचे कोणी अपहरण केले आहे अशी कोणतीही शक्यता दिसून न आल्यामुळे पोलिसांनी काल सकाळपासून पुन्हा एकदा संपूर्ण परिसरात कॉम्बिग ऑपरेशन सुरू केले होते.

# कांद्याला हमी भाव द्या, पीक कर्ज तत्काळ मंजूर करा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जिल्ह्यात सातत्याने शेतकऱ्यांची आंदोलने सुरु असून अशातच अखिल भारतीय किसान सभेच्या माध्यमातून नाशिकच्या चांदवड तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. हक्काची जमीन मिळावी, कांद्याला हमीभाव मिळावा या मागण्यांसह इतर मागण्यांसाठी महिलांसह पुरुषांनी एकत्र येत चांदवड तहसील कार्यालयाला घेराव घातला. मागण्या मान्य करा, अथवा इथेच संसार थाटण्याचा इशारा आंदोलकांकडून देण्यात आला आहे. शेतकरी, शिक्षक, सामान्य नागरिक यांसह अनेक संघटना सध्या आंदोलनाचे हत्यार उपसत आहे. त्यामुळे नाशिक जिल्हा आंदोलनाचे केंद्र बनत चालला आहे. काही दिवसांपूर्वी नाशिक ते मुंबई असा भव्य मोर्चा काढण्यात आला. शेतकऱ्यांसह कामगार वर्ग, आदिवासी बांधव यांच्या मागण्यांसाठी हा लॉन्ग मार्च काढण्यात आला होता. त्यानंतरही आंदोलन सुरूच आहेत. अशातच अखिल भारतीय किसान सभेतर्फे नाशिकच्या चांदवड तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. देशामध्ये वन अधिकार कायदा होऊन अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक, निवासी हक्काची मान्यता मिळावी, कांद्याला हमीभाव मिळावा, पिक कर्ज तात्काळ मंजूर करावे, वन अधिकार कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले त्वरित मिळावे आदीसह इतर मागण्यांसाठी हा मोर्चा धडकला होता. शिंदे सरकार- फडवणीस सरकार हाय हाय, अशा घोषणा देत आमच्या मागण्या पूर्ण करा, अशा घोषणाबाजी देत धरणे आंदोलन करण्यास बसले आहे. जोपर्यंत आमचे मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत हा मोर्चा इथून हलणार नाही, अशी येथील काही कार्यकर्त्यांनी सांगितले.

# पाचेगाव योगवर्धिनी उपकेंद्रावर आंतरराष्ट्रीय योग दिन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील पाचेगाव येथे योगवर्धिनी उपकेंद्रावर अंतर आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिरास मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरा करण्यात आला. अंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. योगा आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आपण नियमित योगासने केल्यास शरीर सशक्त व चपळ आणि लवचिक बनतात त्यांचबरोबर शरीराचे स्नायू बळकट बनतात व शरीराला योग्य प्रकारचे ठेवण तयार होते. योगा करणे हे आपल्या जीवनासाठी खूप महत्त्वाचे आहे परंतु योग करताना योगाची योग्य पद्धत समजून घेऊन योग करणे आपल्या शरीराला फायदेशीर ठरते.
योग म्हणजे शरीराचा व्यायाम नसून योग मानवी मन आणि आत्मा यांची क्षमता जाणून घेणाऱ्या विज्ञानाचा एक भाग आहे. योग अभ्यासातून मानवी जीवनशैलीचा परिपूर्ण सारांश प्राप्त होतो. आपल्या शरीरातील आणि मनातील ताणतणाव दूर करायचा असेल तर त्यासाठी योग फायदेशीर ठरतो. योगातील ध्यान प्राणायाम आणि योगासने नियमित केल्यानंतर तणावापासून मुक्ती मिळते असे मत योग शिक्षक बी.डी.रामपूरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन आरोग्य विभाग परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली पाचेगाव येथील आरोग्यवर्धिनी उपकेंद्र करण्यात आले, याप्रसंगी योगवर्धिनी उपकेंद्रातील डॉक्टर कविता आणि सखाराम हुलगुंडे निर्मला डोंगरे निलाबाई घोडे तर गावचे सरपंच ससे जिल्हा परिषद शाळेचे व्यवहारे ससे विष्णु शिंदे आदी शिक्षक सहभागी झालेले होते त्याचबरोबर अनिल ससे व नागरिक विद्यार्थी मोठ्या संख्येने शिबिरात उस्फूर्तपणे उपस्थित होते.




महाराष्ट्र Business Katta












# पड रं पान्या, पड रं पान्या... कर पानी पानी शेत माझं लय तहान्हेलं, चातकावानी...

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : २२

मृग नक्षत्र कोरडं गेलं, रोहिणी,भरणी नक्षत्रंही कोरडी गेली. आषाढ लागून चार दिवस झाले...तरी पावसाचा पत्ता नाही... उन्हाचा पारा कमी होण्याचं नाव घेत नाही. काळी आई चैत्र, वैशाख, ज्येष्ठासह आषाढाच्याही उन्हाची तलखी सोसत आहे. आमच्या लहानपणी आषाढी एकादशीला खूप पाऊस असायचा. पंढरपूरला पायी जाणाऱ्या दिंड्या भिजत भिजत, वादळ, वारा पाऊस झेलत पंढरपूरात पोहचायच्या आणि एकादशीनंतर परत फिरायच्या. आता मात्र पाऊससुद्धा जनधनच्या खात्यात पंधरा लाख टाकणार असल्याच्या आश्वासनासारखा वागू लागलाय..!

सर्वच शेतकऱ्यांनी उन्हातान्हात आपापली शेतं नांगरुन, वखरून काळीशार करून ठेवलीत. काहींनी कापसाच्या नावानं फुल्या काढून ठेवल्यात. काहींनी सोपं वपं नगदी पीकच घेऊया म्हणून सोयाबीनच्या नावानं कास्या,काडी-कचरा वेचून वावर तळहातासारखं करून ठेवलंय. नव्या नवरीने नटून थटून सेज सजवलेल्या पलंगावर जाऊन पतीच्या आगमनाची वाट पहात पहात तिला झोप लागावी...तिच्या नव्या पतीने मित्रांसोबत त्यानेच दिलेल्या लग्नाच्या पार्टीत दारू ढोसून अगदी उशीराने लेझीम खेळत घरात यावे आणि कुठेतरी कान्याकोपऱ्यात विना अंथरूणाचे झोपून जावे... तशीत अवस्था पावसाची वाट पाहण्यात काळ्यामातीची झालेली आहे. ती नटून थटून फक्त पावसाची वाट पहात आहे. पेरणीचा काळ निघून जातोय आणि पाऊस येण्याचा नुसताच बोभाटा ऐकू येतोय...कुठे चक्रीवादळ, तर कुठे मान्सून कोकणात अडकला. तर राज्यात मान्सूनपूर्व पावसाच्या सरी बसणार ! ....असा पावसाच्या आगमनाच्या नावानं नुसता बोभाटा ऐकायला मिळतोय..! नव्या नवरीवाणी पावसाची गत झालीय...माझ्या 'ओढाळ सुरांच्या देही' या संग्रहातील काव्यपंक्ती अशा...

**किती पाहिली मी वाट**
**सांज ढळली रे सारी**
**हुंदक्यात दाटल्या रे**
**आज पावसाच्या सरी**
**तरी नाही तुझं येणं**
**अंगी वणवा पेटला**
**नुसत्याच बोभाट्यानं**
**जीव उगाच बाटला**

हवामान खाते पावसाच्या नावाचा नुसता बोभाटा करत आहे.

पाऊस मात्र अजून किती दिवस येणार नाही, याची काही हमी नाही. शेतकरी हवालदिल झालेला आहे. अवकाळी पावसाने मे महिन्यातच पावसाळा सुरू केला होता; मात्र आता पेरणीसाठी त्याची गरज आहे, तर तो आभाळाकडे पहायला लावतोय, पेरणीची वेळ निघून गेली आहे तरी तो अजून कसा पडत नाही. पावसाच्या घोरानं शेतकऱ्यांचा बीपी वाढतोय..!

आकाशात काळे ढग जरी दिसले तरी... आता लवकरच पाऊस येईल असा आशावाद शेतकऱ्यांच्या मनात तयार होतोय ; उन्हाच्या तलखीने जीवाची काहिली होतेय.

काल दुपारी आकाशात ढग जमत होते, थोड्या वेळाने तेवढच ऊन चटकत होतं. आषाढ लागूनही अजून पावसाचा पत्ता नाही म्हणून शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागून आहेत. पावसाअभावी पेरण्या खोळंबल्या आहेत. पावसाने शेतकऱ्यांना संकटात टाकले आहे. पाऊस उशिरा का होईना येईलही; परंतु उशिरा आलेल्या पावसाचा पिकांवर अनिष्ट परिणाम होणार. पिकांवर महागामोलाची औषधी खते वापरूनही पिकांचा उतार येणार नाही. खर्च खूप होऊन तो खर्चही निघणार नाही. उशीर झालेल्या खरीपाच्या पिकांची काढणी उशिरा होईल. रब्बीच्या पीकाची



वेळेवर पेरणी करता येणार नाही. म्हणजे रब्बीचे पीकही शेतकऱ्यांचा तोटाच करेल की काय ? अशा चिंतातूर शेतकऱ्यांच्या मनाची अवस्था कोणत्याच डॉक्टरांना कळणार नाही...ती शेतकऱ्याच्या मनालाच ठाऊक असेल. त्याच्या मनाची घालमेल ही वरुणराजाबाबतचीच असणार. फक्त पाऊस लवकर यावा ! मनातल्या मनात त्याची अस्मिता असलेल्या ईश्वराला साकडं घालून पावसाला शेतकरी काय काय विनवणी करत असेल. कवीच्या भाषेत हेच वाक्य त्याच्या तोंडी असेल की...

**पड रं पान्या, पड रं पान्या, कर पानी पानी शेत माझं लय तहान्हेलं , चातकावानी...** जून महिना लागून संपतही आला आहे, अजून पेरणी कुठेच नाही, या दिवसात शेतकऱ्यांना आपल्या मुलांला शाळेत टाकण्याचा घोर, शाळेचा ड्रेस घेण्याचा, पाटी दप्तर घेण्याचा घोर, काहींना मुलाची हजारोने फीस भरण्याची काळजी, बी-भरणासाठी, खत औषधीसाठी पैसा उभा करण्याची काळजी, पेरणी करण्यासाठी पुरेसा पाऊस कधी पडेल याची काळजी, अनेक प्रश्नांचं काहूर शेतकऱ्यांच्या डोक्यात थैमान घालू लागतंय, तरी तो ह्या सगळ्या गोष्टी विस्मरणात टाकून किंवा ही भावी काळजी विसरता यावी म्हणून पंढरपूरच्या दिंडीत सहभागी होतोय. कोसो दूर पायी चालू लागतो. शेतकऱ्यांच्या अंगात अशी सहनशक्ती येतेच कुठून ? असाही प्रश्न पडतो.

एक बरं झालं पावसाचं येणं न येणं निसर्गाच्या हातात आहे, नाहीतर ते प्रत्येक मतदार संघाच्या आमदार, खासदारांच्या हातात असतं तर पावसासाठी सुद्धा आमदार खासदारांच्या घरासमोर धरणे ,आंदोलनं करावी लागली असती. "अगोदर आमच्या मतदार संघात पाऊस पाडा. नाहीतर आम्ही निवडणूकीत मतदानावर बहिष्कार टाकू." "आमच्या मतदार संघात पाऊस पाडा, नाहीतर खुर्ची खाली करा." अशा अनेक घोषणांची निर्मिती झाली असती. नेत्यांनी सुद्धा शेतकरी वर्गाला मतदार संघात पाऊस पाडण्यासाठी वेठीस धरलं असतं... परंतु बरे झाले पावसाची सूत्रे दयाळू निसर्गाने स्वतः कडे ठेवून घेतली.

# के.सी.आर. बिपरजॉय नागपुरात भाजपाच्या गडावर



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**मराठीत जुन्या जाणत्या लोकांनी त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवावरुन कांही म्हणी, वाकप्रचार रुढ केले आहेत ते समाजाच्या विविध अंगात वेळोवेळी कामाला येवून तंतोतंत खरे ठरतात. ज्यामूळे सत्य असत्याची प्रमाणबद्धता ठरवता येवून सिद्ध करता येते. आजच्या तरुणाईला अशा व्यवहार अनुभवाची गरज वाटत नाही त्यामूळे बहुतांश मंडळी तरूण असो वा मध्यम त्यांना अशा प्रत्यक्ष व्यवहार ज्ञानाचे फारसे महत्त्व नसते. भले आपण कितीही थेरॉटिकली पूर्ण ज्ञानी असलो तरी त्याला प्रॅक्टीकल ज्ञाना शिवाय महत्त्व नसते. समाजाच्या विविध क्षेत्रांत कार्यरत असताना थेरीपेक्षाही प्रॅक्टीकलला महत्त्व देणे जास्त गरजेचे असते, थेरी हे शरिर घडविते पण प्रॅक्टीकल हे माणसाचे मन घडवत असते जे आयुष्यात त्याला आईच्या शिदोरी सारखे नेहमीच कामाला येते. मित्रहो लेख विषयाला स्पर्श करण्यापूर्वी असे शिर्षक का निवडले याचा खुलासा होणे ही गरजेचे आहे.**

लेख विषयाला अनुसरून वाकप्रचार असा आहे 'शेण पडलं की माती घेवून उठते', नक्किच विचार मंथनाचा वाकप्रचार असून समाजातील सर्व स्तरावरील लोकांसाठी लागू पडतो. देशासह महाराष्ट्रात सध्या २०२४ च्या लोकसभा निवडणूकीची पूर्वतयारी जोरात चालू आहे. कुणी नऊ वर्षाचा लेखाजोखा जनते समोर ठेवून सभा घेत फिरत आहेत, कुणी अस्तित्व शून्य राजकीयपक्ष व त्यांचे पुढारी वर्तमानातील सत्ताधारी कसे फसवे आहेत म्हणून जनतेला दाखवून देण्यासाठी विरोधी पक्षाची मोट बांधून २०२४ ला आपण कसे सत्तेत येणार याची बेरीज वजाबाकी करत फिरत आहेत. बहुसंख्य प्रादेशिक पक्ष जनतेला सवलतीच्या मोहजाळात आडकवून परदेश गमनाप्रमाणे परराज्य भ्रमण करत फितर असल्याचे चित्र आपण हौसे, गवसे, नवसे व निराधार लोकप्रतिनिधी हव्यासी जनतेला घेवून मार्गस्थ असल्याचे बघत आहोत. एकंदरीत प्राप्त राजकीय परिस्थिती व नेत्यांच्या गुणावगुणांचे अवलोकन केले तर ही सर्व नेतेमंडळी देश व जनतेला अखेर कुठे नेऊन सोडणार हा विचारवंतांसाठी विचार करावयास लावणारा यक्षप्रश्न आहे. सर्वसामान्य जनतेला नको त्या सोई सवलती देऊन व्यक्ती व देशाला कसे कर्जबाजारी करत आहेत याचा विचार करण्यास सर्वसामान्य जनता मात्र संभ्रमात नक्कीच आहे.

आपले अस्तित्तव सिद्ध करून ते टिकविण्यासाठी व्यक्तीपत्त्वे समाजाला, देशाला स्वावलंबी करण्या ऐवजी सवलती देऊन पंगू बनवत आहेत. जनता ही कुठल्याच प्रकारचा विचार, तर्कवितर्क न करता फुकट व विनासायास जे मिळते ते प्राप्त करून घेण्यासाठी जंगली कुत्र्याप्रमाणे भक्षावर तुटून पडून आपले उखळ पांढरे करून घेत आहे. येथे ना जनतेला व त्यांच्या पुढार्युंना सत्ता व पैशाच्या मोहापायी कुठलेच नैतिकतेचे व प्रामाणिक समाजमूल्यांचे मोजमाप न करता कसलेच अधिष्ठान राहिलेले नाही. जो तो उठसूठ सर्व कांही फुकट व विनासायास मिळविण्याच्या स्पर्धेत अग्रेसर आहे. याची बुद्धीवंतांनी खोलात जावून कारण मिमांसा करून जनतेचे प्रबोधन करणे गरजेचे वाटते.

मागच्या तीन वर्षापासून महाराष्ट्रातील विविध आघाडीचे नेते व राजकीय पक्षांनी जनतेचे हित व कल्याणचा बोजवारा करत आपापसावर कुरघोडी करून सर्वसामान्यांला किमान चांगले जगता येईल असे कांय दिले ? याचा विचार जनतेच्या मनांत घर धरून आहे. दर पाचवर्षांनी निवडणूका येतात म्हणून वाट बघण्याशिवाय जनतेसमोर दुसारा पर्याय नसतो. नेमके हेच सुत्र हेरून महाराष्ट्रातील राजकारण्यांचे




असे चित्र बघून शेजारील तेलंगणा राज्याचे कर्तेधर्ते म्हणवणारे बि.आर.एस. पक्षाचे प्रमुख केसीआर यांनी महाराष्ट्रासह तेलंगणा राज्याच्या आजूबाजूच्या राज्यात आपले पाय पसरविण्याचा व आपला पक्ष राष्ट्रीयपक्ष व्हावा म्हणून किमान अंशी भविष्यात देशात बि.आर. एस. ला अच्छे दिन यावेत म्हणून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या तमाम राजकिय पक्षातील असंतुष्ठांना एकत्र करून महाराष्ट्राचा वर्तमानातील तेलंगणा कसा करता येईल याचा सपाटा लावण्यास सुरुवात केली आहे. मागील तीन महिन्यापूर्वी के.सी.आर. यांनी नांदेड मुक्कामी सभा घेऊन नांदेडच्या कॉंग्रेसी अस्तित्वाला धक्का दिला. असे धक्कातंत्र वारंवार अवलंबून मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खाणदेशासह आता भाजपचा अभेद्द गड माणणाऱ्या विदर्भातही त्यांनी आपला झेंडा रोवून भाजपच्या नेतृत्त्वाला हादरा दिला. एकंदरीत महाराष्ट्राच्या राजकारणातील विविध राजकीय पक्षांच्या सर्व असंतुष्टांना एकत्र करून बि.आर.एस. महाराष्ट्रात आपले पाय भक्कम करण्यास सुरुवात केली. पण बि.आर.एसच्या सर्वेसव्र्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी हा महाराष्ट्र छत्रपतीसह शाहु, फुले व आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. तुम्ही कितीही असंतुष्टांना एकत्र केले तर येथील तमाम जनता भले-बुरे, चांगले-वाईट, खरे-खोटे ओळखण्यात पारंगत आहेत.

महाराष्ट्रातील तमाम राजकिय पक्षांना कळकळीचे आव्हान आहे आपल्या विचार व आचरणांतील दुटप्पी व फितुरी टाळून घरभेद्यांपासून सावध राहून आपले गड बरुज मजबूत व अभेद्द्य ठेवा. यासाठी तन, मन, धनाने महाराष्ट्रातील तमाम जनतेशी प्रामाणिक राहून राजकारण व समाजकारण करा अन्यथा अशा गणोजी शिर्केयांच्या अवलादीमूळे स्वराज्याचे सुराज्य होणार नाही व म्हणून महाराष्ट्रातील जनता तुम्हाला माफही करणार नाही. वादळे येतात आणि जातात पण प्रामाणिक व भक्कम पाया असणाऱ्या इमारती अशा वादळापुढे जराही डळमळीत होत नाहीत. पण कधीकधी म्हणावेसे वाटते "शेणं पडलं की माती घेऊन उठते." याचा उच्चार करावासा वाटला.

**" आखिर चिटीं भी हाथीको परेशान कर सकती है ।" जय हिन्द ।इन्कलाब जिंदाबाद ।लाल सलाम**

# ‘मुसळावानी ये... जगबुडी होऊ दे’



मधुकर भावे
ज्येष्ठ पत्रकार

आधुनिक केसरी

**चक्रीवादळ गुजरातच्या किनाऱ्यावर धडकले. गुजरातमध्ये पावसाचा धुमाकूळ झाला. कधी नव्हे तो हाच पाऊस पुढे राजस्थानभर तीन दिवस कोसळला. संपूर्ण पावसाळ्यात राजस्थानात तीन इंचही पाऊस पडत नाही. जोधपूरमध्ये तर महापूर आला. वेधशाळांचे सगळे अंदाज चुकले. पूर्वी बाळासाहेब ठाकरे यांनी मार्मिकमध्ये छान व्यंगचित्र काढले होते... वेधशाळेने अंदाज वर्तवला होता की.... ‘आज मुंबईत तुफान पाऊस...’ कामावर जाणाऱ्या कर्मचाऱ्याने सोबत छत्री घेतल्यावर त्याची पत्नी त्याला म्हणते की, ‘छत्रीची गरज नाही...’ तो सांगतो की, ‘वेधशाळेचा अंदाज आहे, तुफान पाऊस येणार....’ पत्नी सांगते की, त्याचमुळे तुम्हाला सांगते की, ‘आज छत्रीची गरज नाही....’ त्या व्यंगचित्रासारखे वेधशाळेच्या अंदाजाचे झाले आहे. मृग कोरडा गेला.**

परिस्थिती बिकट होत चालली आहे. महाराष्ट्राच्या गलीच्छ राजकारणाचा एवढा धुरळा आकाशात उडालेला आहे की, आकाशातील ढगही बहुतेक घाबरले.... आणि ते गुजरात-राजस्थानकडे सरकले. या घाणेरड्या राजकारणात झालेल्या चिखलात आपल्या पाण्याची आणखी भर पडून जास्त चिखल होऊ नये, असा त्या ढगांचा उदात्त सामाजिक उद्‌देश असावा! या घाणेरड्या राजकारणाचे सोडून द्या. महाराष्ट्र आता सुधारेल असं काही वाटत नाही. पण, त्यामुळे प्रश्न संपत नाहीत. उलट अधिक बिकट होतो. पाऊस आला काय आणि नाही आला काय.... सरकारला कशाचे काहीही पडलेले नाही. आजची वृत्तपत्र आणि सरकारचे आरोप-प्रत्यारोप महाराष्ट्रातल्या १२ कोटी लोकसंख्येपासून आणि प्रामुख्याने ग्रामीण प्रश्नांपासून कोसो दूर आहेत. कोणाला काही पडलेले नाही. महाराष्ट्रातील बहुसंख्य नद्या कोरड्या ठाक पडल्या. विहिरी, तळी आटून गेली. मुंबईसारख्या शहरात पाणी पुरवठा करणाऱ्या तलावांची परिस्थिती प्रत्येक दिवशी धोक्याची होत चालली आहे. तिकडे कोयना धरण कोरडे पडलेय... जल विद्युतिनिर्मितीला पाण्याची गरज... उद्या वीजकपात अटळ आहे. आख्या कोकणाला कोयनेची वीज जाते. संपूर्ण कोकण समुद्र किनाऱ्यावर वसलेले आहे. पण, ‘समुद्री चहुकडे पाणी... पिण्याला थेंबही नाही’ ही कोकणची अवस्था वर्षानुवर्षे महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस पडणारा भाग. पण, सगळे पाणी समुद्राला मिळते. आजून १५-२० दिवस पाऊस आला नाही तर परिस्थितीचे गांभीर्य कल्पनेच्या पलिकडचे आहे. १९७२ च्या दुष्काळात मुंबईचे महापौर पाटकर होते. त्यांनी जाहीरपणे सांगून टाकले की, ‘अर्धी मुंबई खाली करावी लागेल’. त्यावेळी महाराष्ट्रात पाऊस झाला होता. मुंबईच्या आसपास तलाव भागात पाऊस नव्हता. आता महाराष्ट्रातही पाऊस नाही. आणि मुंबईतही नाही. घामाच्या धारा लागलेल्या आहेत. मुंबईतील अर्धी लोकसंख्या लोकलच्या प्रवासावर आहे. बाहेर कडक ऊन.... गाड्यांना गर्दी... घामाच्या धारा... चर्चगेट, सी.एस.टी. या स्थानकांतून बाहेर आल्यावर शेअर टॅक्सीला रांगा... उपनगरांत गेल्यावर शेअर रिक्षासाठी रांगा... प्रत्येक दिवस असह्य आहे. ६०-७० टक्के लोकांची घरे एक- दोन खोल्यांची आहेत.... किमान १५ लाख लोकांची घरे पत्र्याची आहेत... माणसं घरात उबलेली आहेत. बाहेर पडली तरी अस्वस्थ आहेत. कामावर जावच लागत आहे... बाहेर पडावेच लागत आहे... ९० टक्के मुंबईकरांची पोटं हातावर आहेत. काही टक्के राजकारणी असे असू शकतील... त्यांचे भरल्या पोटावर हात आहेत. ग्रामीण महाराष्ट्र असाच होरपळलेला आहे... मुंबई होपरळलेली आहे. मुंबईत पाणी कपात होणार आहे... वीज कपात होणार आहे... ग्रामीण महाराष्ट्राची परिस्थिती याहून बिकट आहे. मोठ्या धरणांतील बहुसंख्य धरणांनी तळ गाठला आहे. ‘उजनी’ धरणाचे पाणी सोलापूरला पुरवले जाते. पण पुणे आणि कात्रजमध्ये तुफान पाऊस झाला तरच उजनी धरण भरते. पुणे हे तापलेल्या त्वाव्यासारखे आहे. पुण्याजवळची पाचही धरणांची पातळी झपाट्याने खाली गेली. मूळात ही धरणं शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी बांधली होती. पुणे शहर एवढे वाढले आहे की, सगळ्या धरणांचे पाणी पुणे शहरालाच पुरवावे लागत आहे. शेतीला पाणीच शिल्लक राहात नाही. सगळीच गणिते चुकत चालली आहेत. मूळ प्रश्न गळ्याला फास आवळावा, इतके बिकट होत चालले आहेत. वाढत्या लोकसंख्येने पर्यावरणाचा नाश हा आणखी वेगळाच प्रश्न आहे. त्यावर विचार करायला कोणाला वेळच नाही. एकट्या मुंबई शहरात केवळ मेट्रो फिरवण्यासाठी लाखभर झाडे तोडली. सिमेंटचे जंगल उभे राहिले. मुंबईचे तापमान ४२ अंशापर्यंत कधीच पोहोचले नव्हते. मुंबई असो... महाराष्ट्र असो... परिस्थिती बिकट होत चालली आहे. पर्यावरण तज्ज्ञ अतुल देऊळगावकर यांच्यासारख्या अभ्यासकांनी एका लेखात असे स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्रातील ५५ नद्यांची १४७ पात्रे प्रदूषीत झाली आहेत. तिकडे गंगामाई साफ करण्याची घोषणा पंतप्रधान मोदीजी यांनी केली होती. त्यातून प्रेते वाहताना पहावी लागली. महाराष्ट्राच्या नद्या एवढ्या कोरड्या आहेत की, त्यातून काहीही वाहून जाण्यासाठी पाणीच राहिलेले नाही. पुढच्या काही दिवसांत महाराष्ट्रात अतिशय बिकट परिस्थिती असेल... पश्चिम महाराष्ट्रात पेरण्या झाल्यासुद्धा. पण, पाऊस नाही... पेरण्या फुकट गेल्या. विदर्भात गेल्यावर्षीचा कापूस आजून विकला गेला नाही. कारण त्याला भावच नाही. सरकारची एकाधिकार योजना जागेवर नाही. शेतकऱ्यांच्या कापसाची किंमत पाडून त्याला मातीत घातले जात आहे. बोलणारे कोणी नाही... आवाज उठवणारे कोणी नाही... आता जांबुवंतराव नाहीत... ए. बी. बर्धन नाहीत.... सुदामकामा नाहीत... शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरणारा नेताच राहिलेला नाही. पश्चिम महाराष्ट्रात उद्धवराव पाटील नाहीत... एन. डी. पाटील नाहीत... गणपतराव नाहीत... लढणारी माणसच नाहीत. सत्तेसाठी हापापले खूप आहेत. लोकांच्या प्रश्नावर रान उठवणारे किती आहेत? मुंबईत मृणालताई नाहीत... महिलांचे प्रश्न कमी आहेत का? पण लढणारे कोणी नाही. वृत्तपत्रांना कशाचेही काही पडलेले नाही. विदर्भातील वृत्तपत्रांनी कापसाच्या प्रश्नावर केवढे रान पेटवायला हवे होते. हताश शेतकरी घरात कापूस कोंबून ठेवला आहे. त्या कापसाची विक्री झाली नाही तर... येणाऱ्या खरिपासाठी पैसे कुठून आणणार? त्याच्या कोंडीला सीमा नाही. त्याला आवाज नाही... त्याचे ऐकणारे सरकार नाही... त्याच्या बाजूने बोलणारा नेता नाही... गेल्या आठवड्यात वर्ध्यामध्ये गुजरातमधून आलेला १ कोटी रुपये किमतीचे बोगस बियाणे घेवून आलेला ट्रक पकडला. ट्रक गुजरातमधून आला. बोगस बियाणांचे मूळ गुजरातमध्ये आहे. त्याची बाजरपेठ महाराष्ट्र. वृत्तपत्रांनी केवढा आवाज उठवायला हवा होता. हे बोगस बियाणे पोलिसांनी पकडले... ज्यांनी कारवाई केली त्याच्या हिमतीची तारिफ केली पाहिजे. ट्रक गुजरातमधून येत होता. अलिकडे गुजरात म्हटले की, कारवाईची हिम्मत कोणीच करत नाही. सगळेजण दहशतीखाली आहेत. हे बोगस बियाणे जर बाजारात गेले असते तर हजारो शेतकऱ्यांची फसवणूक झाली असती. पण प्रकरण दडपल्यासारखे आहे. बोगस बियाणांचा व्यापार एक- दोन व्यक्ती करू शकत नाहीत. ही मोठी टोळी आहे. त्याचा कोणीतरी म्होरक्या आहे.... त्याच्यामागे कोणाचातरी राजकीय पाठींबा आहे. त्याशिवाय एवढी हिंमत होणार नाही. आणि खेळ कोणाच्या जीवाशी चालला आहे? कष्टाने कसंतरी जगणाऱ्या शेतकऱ्याच्या जीवाशी? काय झालं पुढं त्या ट्रक पकडलेल्या बोगस बियाणे रॅकेटचे? शेवटपर्यंत कळणार नाही. सगळ्या बाजूंनी सामान्य माणसांची अशी भयानक कोंडी आहे... सरकार जागेवर असून नसल्यासारखे आहे. कृषीमंत्र्याला कशाचेही काही पडलेले नाही. पण निसर्गसुद्धा सामान्य माणसाच्या विरुद्ध गेला आहे. त्या निसर्गालाही कष्टाने जगणाऱ्या शेतकऱ्याची कीव का येत नाही?... पाऊस येवो किंवा न येवो.... अंबानी-अदानी यांना काहीही फरक पडत नाही. सरकारमधील मंडळींनाही काही फरक पडत नाही.. एसीमध्ये बसणाऱ्याला बाहेरच्या त्रासाची कल्पना येणे शक्य नाही. शेतीतल्या कष्टाची कल्पना त्याच्या पलिकडची आहे. शहरं रंगवण्याचे आणि सजवण्याचे काम जोरात चालू आहे. आणि खेडी उद्धवस्त होत आहेत... या बिकट परिस्थितीत महिनाभर जर पाऊस फरार झाला तर कोणत्या पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवायची... २९ जूनला आषाढी एकादशी आहे. आता तो एक पांडूरंगच असा आहे की, त्याच्या चरणावर डोके ठेवल्याशिवाय पर्याय नाही. बा विठ्ठला, तू तरी आता महाराष्ट्राला सांभाळून घे रे बाबा... आणि धुँवाधार बरसात कर... दया पवार त्यांच्या कवितेत म्हणाले होते.... ‘मुसळावानी ये आणि जगबुडी होऊ दे...’ आजची स्थिती अशी आहे की, जगबुडी झाली तरी चालेल... पण पाऊस हवा आहे. आज वसंतराव नाईकसाहेबांची आठवण येतेय.... पागेसाहेबांची आठवण येते... यशवंतराव माहिते यांची आठवण येते... रोजगार हमीची आठवण येतेय.... कापूस खरेदी योजना आठवते आहे... शेतकऱ्याला भाव पाडून नागडे करण्याचा सटोडीयांचा डाव महाराष्ट्राच्या कापूस एकाधिकार योजनेने हाणून पाडला होता. नाईकसाहेब म्हणाले होते, ‘शेती मोडली तर लोकशाही मोडेल... ’ आज लोकशाही मोडण्याचे काम चालू आहे... शेती तर मोडलेलीच आहे. उद्या महाराष्ट्रावर रोजगार हमीची कामे काढण्याची वेळ येणार, ही भिती आहे.... पण, सरकारची काय तयारी आहे? १९७२ च्या दुष्काळात चार-चार, पाच-पाच लाख लोक रोजगार हमीची कामे करत होते. त्यात लाख-दीड लाख स्त्रिया होत्या. भूम परांड्यात खडी फोडताना रोजगार हमीवर हाताला घट्टे पडून त्यातून रक्ताची चिळकांडी आलेली भूम परांड्यात त्यावेळच्या दुष्काळ दौऱ्यात पाहिलेली आहे. या कष्टकरी बाया घरी गेल्या की, वीज गेलेली असायची. मग ८- १० तास काम करून आलेल्या भगिनीला जातं टाकून ज्वारी दळायला लागायची. लेकरांना खाऊ घालायचं... दारू पिणाऱ्या नवऱ्याचा मार खायचा.... सकाळी भाकऱ्या बडवून पुन्हा रोजगार हमीवर हजर.... आज कोणी विचार करू शकेल का? शिंदेसाहेब, जरा समजून घ्या महाराष्ट्र कसा होता ते.... या भगिनीच्या हालाचा विषय वसंतराव नाईकसाहेबांच्या कॅबिनेटमध्ये चर्चेला गेला होता. आणि त्यातून अर्धी मजुरी आणि अर्ध्या मजुरीएवढे ज्वारीचे पीठ याचे वाटप लाखो पिशव्यांनी करायचा प्रस्ताव मोहितेसाहेबांनी मांडला. त्या भगिनिचे केवढे कष्ट टळले.... यंत्रनेने अतियश प्रामाणिकपणे त्यावेळी काम केले. महाराष्ट्र त्यातून उभा राहिला. काहीही बदमाशांनी त्याचा फायदा उचलला पण, असे बदमाश सर्वच काळात असतात... आणि त्यांना पक्ष नसतो... जात-धर्म नसतो... त्यावेळी याची चर्चा ‘बदमाशांची जात किंवा धर्म कोणता’? अशी कधीच झाली नाही. कारण त्यावेळी अशा वादावरच पोट जाळणारे मिडियावाले नव्हते. सकारात्मक दृष्टी होती. त्या कठीण काळात महाराष्ट्राच्या पशुधनाच्या छावण्या आठवतात... एकेक कोटी रुपयांचा चारा एकेका दिवशी पशुधनांसाठी वापरला जात होता. ते सगळे दुष्काळाचे चित्र डोळ्यांना पाहिले आहे. त्याचे शब्दांकन त्याच क्षणी केले आहे. महाराष्ट्रावर ही वेळ पुन्हा येऊ नये... कोणावरही येवू नये... पण, दुर्देवाने दुष्काळाच्या भीषण सावल्यांची मनाला भीती वाटू लागली आहे. हे काल्पनिक भय नाही. खेड्यातील परिस्थिती कठीण आहे. मुंबई- पुण्यासारख्या शहरात पाणीकपात झाली तर पैसेवाल्यांना बिसलरीची कमतरता नाही. आता बिसलेरीवालेही भाव दुप्पट करून येणाऱ्या संकटात कमवून घेतील... एक पाहणी अशी आहे की, २०२३ मध्ये देशातील बिसलरी बाटल्यांची ४५० अब्ज रुपये एवढी विक्री असेल... कारण शुद्ध पाण्याचा आता अभावच आहे. कष्टकऱ्या ग्रामीण भागाला ही बिसलरी परवडणारी आहे का?

एकूणच महाराष्ट्राचे चित्र पुढच्या काही दिवसांत अवघड वाटते आहे. रोजगारासाठी संघर्ष, पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी संघर्ष, जगण्यासाठी संघर्ष.... ७५ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही या संघर्षात फार फरक झाला नाही. आज अंतुलेसाहेबांचीही आठवण येते... त्यांनी योजना आणली होती की, अरबी समुद्रात ३०० किलोमीटर लांब खाऱ्यापाण्याचे गोडे पाणी करण्याचा प्रकल्प टाकू या.... तेव्हाचे ५००० कोटी... त्या योजनेची एसी. केबीनमध्ये बसून संपादकीय लिहिणाऱ्या, मोठी नावे असलेल्या, संपादकांनी अग्रलेखातून केवढी टिंगल उडवली होती! पण आज एशिया खंडातील कितीतरी छोटे- मोठे देश हाच प्रकल्प राबवून हवं तेवढं पाणी उपलब्ध करून घेत आहेत. राजकारण करायचे तेव्हा राजकारण करा... अर्थात आजचे महाराष्ट्राचे राजकारण एवढे घाणेरडे आहे, अशा घाणेरड्या राजकारणाचा आणि सत्ता कारणाचा महाराष्ट्र कधीच नव्हता. पण आज दोन- पाच टक्के लोकांना त्या राजकारणाशी पडले असेल.. ९४-९५ टक्के महाराष्ट्राला ‘पाऊस कधी येतोय..., माझी शेती कधी फुलते आहे... धरणं कधी भरताहेत...’ या एकाच आणि एकाच गोष्टीची महाराष्ट्र वाट पाहात आहे... २९ जूनच्या आषाढीच्या दिवसापर्यंत धुँवाधार पाऊस येऊ दे... साऱ्या महाराष्ट्राची चिंता दूर होऊ दे... त्यासाठी आपण सगळे विठुनामाचा गजर करू या...

ये रे ये रे पावसा.... तुला देतो पैसा....
पैसा झाला खोटा... पाऊस आला मोठा....

सध्या उलटे झाले आहे.... पैसा मोठा झाला आणि खोटा पाऊस (कृत्रिम) पाडण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्राला नैसर्गिक पावसाची तहान लागली आहे.

# मंदिरात वस्त्रसंहिता का आवश्यक ?



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**सध्या मंदिरात वस्त्र संहिता असावी का ? याबद्दल जनमानसात आणि सोशल मीडियावर फार मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. वास्तविक पाहता एक चांगला विषय जो मंदिरात प्रवेश करताना वस्त्र कसे असावे याबाबत संस्कार, संस्कृतीची दिशा दाखवत आहे. गेल्या महिन्यात मंगळग्रह मंदिर. अमळनेर. जिल्हा जळगाव. येथे याबाबतचा फलक लावून निर्देश दिले होते. अंग प्रदर्शक, उत्तेजक, असा व अशोभनीय वस्त्रधारी तसेच हाफपॅन्ट, बरमोडा धारींना मंदिरात प्रवेश नाही. कृपया भारतीय संस्कृतीचे आणि सभ्यतेचे भान ठेवा. मंदिरात प्रवेश करताना अशा प्रकारचा ड्रेस असावा थोडक्यात अंग प्रदर्शन करणारे करणारी आणि उत्तान पणा दर्शवणारे ड्रेस नसावे तसेच पुरुषांनी मुलींनी हाफ चड्डी घालून घेऊ नये.**

त्या फलकाचे फोटो वर्तमानपत्र आणि सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले आणि त्यानंतर मंदिरा मंदिरात या विषयाची चर्चा सुरू झाली आणि मग बऱ्याच ठिकाणी अशी आचारसंहिता असावी असे मत व्यक्त केले गेले. त्यानंतर काही मंदिरांमध्ये या वृत्ताची दखल घेतली गेली. जसे तुळजाभवानी मंदिर तुळजापूर, या ठिकाणी असा फलक लावण्यात आला त्यानंतर काही लोकांनी त्यावर आक्षेप घेतला,बराचसा गदारोळ झाला आणि मग ती वस्त्रसंहिता मागे घेतली. तुळजापूर मंदिरामध्ये तुळजापूर मंदिर देवस्थान प्रशासक तहसीलदार यांनी तो निर्णय मागे घेतला. कोणतेही निर्बंध नाही असा फलक लावण्यात आला असेही वृत्तप्रसिद्ध झाले. त्यानंतर अशीच वस्त्रसंहिता अनेक मंदिरात लागू करण्यात आली.

सप्तशृंगी गड ग्रामपंचायत त्यांच्या मासिक बैठक ठराव केला आणि महिलांनी तोकडे कपडे घालून मंदिरात किंवा परिसरात प्रवेश करू नये. पावित्र राखावे. असे आवाहन ग्रामपंचायतीने भाविकांना केले.ठराव संस्थान कडे दिला जाणार होता त्याचे भावीकां कडून स्वागत झाले. परंतु देवस्थानचे व्यवस्थापक यांनी ठराव आल्यानंतर विश्वस्त आणि भाविकांशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाईल असे म्हटले. सध्या कुठलाही ड्रेस कोड लागू नाही. त्यामुळे भाविकांनी गोंधळून न जाता दर्शन घ्यावे असे म्हटले. तर मंदिरात असा ड्रेस कोड लागू करणे हा निवळ मूर्खपणा आहे असे माजी मंत्री छगन भुजबळ म्हणाले. मंदिरात असणारे पुजारी सुद्धा अर्धनग्न अवस्थेत असतात. त्याचे काय ? त्यांना एखादा सदरा.बंडी घालण्यासाठी सक्ती करावी अशी मागणी केली. अर्थातच विषयाला वेगळे वळण देण्याचा हा प्रयत्न असल्याचे स्पष्ट दिसते. विरोधासाठी विरोध म्हणून भाष्य करायचे आणि आपले वेगळेपण दाखवायचे हे त्यांचे नेहमीच आहे. देव ब्राह्मण आणि पुजारी म्हटल्यानंतर त्यांनी त्याच्यावर भाष्य केले नाही तर मग नवलच काय ?

अशाप्रकारे विषयाला मूळ मुद्द्यापासून दूर नेण्याचे काम त्यांनी करायला नको. राहिला प्रश्न तो पुजाऱ्याचा. पुजारी असला तरी त्याच्याकडे पाहून काही कोणाची वासना जागृत होत नाही हे भुजबळ यांनी लक्षात घ्यावे आणि उगीच काहीतरी प्रत्येक वेळी मंदिर आणि ब्राह्मण पुजारी यांच्या विषयी काहीतरी बोलून परिस्थिती बिघडवावी. हे ही योग्य नाही. त्यानंतर कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरातही पाच वर्षापूर्वी अशी नियमावली लावली होती. पण तेव्हाही विरोध झाला होता. आता काय निर्णय घेणार समजले नाही. याविषयी चर्चा होऊन अशाप्रकारे संहिता लागू करण्याचा विचार व्हायला हवा.

नागपूर येथेही हिंदू जनजागरण समिती चे अध्यक्ष व महाराष्ट्र मंदिर महासंघाचे समन्वयक सुनील घनवट यांनी पत्रकार परिषद घेतली त्यात गोपाळ कृष्ण मंदिर, हनुमान मंदिर, तसेच बृहस्पती मंदिर याचे विश्वस्त हजर होते. नागपूरमध्येही 20 ते 25 मंदिरात वस्त्रसंहिता लागू करण्याविषयी विचार सुरू झाला आहे.



हा वाद सुरू झाल्यानंतर जनमानसातून तसेच सोशल मीडियावर अनेक प्रतिक्रिया आल्यात. नाहीतर प्रतिक्रियांचा पाऊसच पडला. ज्यांना देवस्थानचे नियम पाळायचे नसतील त्यांनी आपल्या घरी राहून पूजाअर्चा करावी आणि यायचे असेल तर देवस्थानचे नियम पाळावे. खरं तर निर्बंध घालायची वेळ येते हीच लाजिरवाणी गोष्ट आहे. मंदिराचे पावित्र्य राखणे हे आपले हातात आहे. मंदिराचे नियम पाळणे आवश्यक आहे. परंतु दान पेटीतले पैसे कमी होऊ लागले म्हणून निर्णय मागे घेतला जातो हे सुद्धा योग्य नाही. व्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही फॅशनच्या नावाखाली इतरांना लाज वाटेल असे ड्रेस का घालावे ? आता आपल्या हिंदू समाजाने धर्मनिष्ठ रहायला हवे. हा निर्णय योग्यच आहे आपणच आपली संस्कृती आणि परंपरा जपली पाहिजे. या गोष्टीशी आपण सहमतच असायला हवे. तिरुपती बालाजी मंदिर, पद्मनाभ मंदिर, तसेच स्वामीनारायण मंदिर, अशा अजूनही काही ठिकाणी नियमावली लागू आहे आणि त्याप्रमाणेच दर्शन दिले जाते. मग इतर ठिकाणी तसे का होऊ नये ? समाज प्रबोधन करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने, कीर्तनकार, प्रवचनकार, यांनी या बाबीवर प्रबोधन करायला हवे. भारतीय राज्यघटनेनुसार नागरिकांनी काय खावे, काय प्यावे, कुठले पोषाख परिधान करावे याचे स्वातंत्र्य आहे तो प्रत्येकाचा हक्क आहे. मनामध्ये भक्ती भाव असावा. अशी बंदी आणणे म्हणजे मूर्खपणा आहे.असाही सूर उमटला. खरं म्हणजे आता हा प्रश्न चर्चेचा आणि वादाचा न करता अशी नियमावली लावण्याची गरज का निर्माण झाली ? हा विचार करायला लावणारा का प्रश्न आहे. आपल्याला आता ही सवय झाली आहे की आपण स्वतःहून कुठलीही गोष्ट करायला तयार नसतो. त्यामुळे नियम आणि कायदे करून ती जबरदस्ती आपल्यावर लादली जाते आणि तोपर्यंत आपण त्या गोष्टीचे पालन करीत नाही. या मागील हेतू चांगला असल्यामुळे ती स्वेच्छने स्वीकारयला का आपण पुढे येत नाही आणि जर स्वीकारले गेले तर मग जबरदस्ती किंवा नियम करण्याची आवश्यकताच नाही. सध्या कशा प्रकारचे ड्रेस घालावेत याचे बंधन नाहीत. त्यामुळे निरनिराळ्या फॅशन आणि ड्रेस बघायला मिळतात. अर्थात प्रत्येकाची आवड निवड वेगळी असते.अंग झाकणारा ड्रेस असाही नको की अगदी फिट्ट की ज्यातून शरीराचे एक एक अवयव स्पष्ट दिसतील.कधी कधी हाफ पँट मुलांच्या व मुलींच्याही..मांड्या दिसतात अशा. आता कोणाला सांगण्याची सुद्धा सोय राहिलेली नाही.मंदिरात येणाऱ्या काही स्त्रियांचा तर छातीचा अर्धा भाग उघडा दिसतो. तर पाठीवर फक्त ब्लाउज चे बंद बांधले असतात. फँशन.पाठ उघडी.पोट उघडे. खरं तर बऱ्याच वेळा बघणारा माणूस ओशाळतो. काही मुलं मुलीचा जागोजागी फाटलेल्या पॅन्ट घालतात काय तर हे नवीन फॅशन आहे. पायाच्या पोटरीवर, मांड्यावर, मागून नितंबावर, त्या फाटलेल्या असतात. आता पंजाबी ड्रेस असतो पण छातीवर ओढणी नसते,ओढणी असली तरी गळ्यात आवळलेली. ड्रेसचा गळा मोठा..म्हणजे वरचा भाग दिसणारच. अशा प्रकारचे ड्रेस घातल्यानंतर कोणाचेही लक्ष तिकडे जाणारच, अगदी वयस्कर माणूस असो किंवा तरुण मुलगा असो आणि असे काही दिसले तर मंदिरातील पावित्र्य ते काय राहणार. मोठ्या मोठ्या ऋषींची तपश्चर्या रंभा, मेनका, अप्सरा, यांनी आपल्या अविर्भावाने भंग पावली तर आपण तर सामान्य माणूस.








प्रत्येक पालकाला असे वाटते की, आपले मुल चार चौघांमध्ये शोभून दिसावे, कुशाग्र बुद्धीचे असावे. यासाठी त्यांनी पाल्याच्या जन्मापूर्वीपासूनच प्रयत्न करावे लागतात. आयुर्वेदानुसार गर्भसंस्कार म्हणजे काय आणि त्यामध्ये काय करावे लागते, याविषयी आपण अधिक माहिती पाहू. १.आजच्या लेखामध्ये गर्भसंस्कार म्हणजे काय?
२.गर्भधारणेपूर्वी कोणती आयुर्वेद चिकित्सा करावी?
३.गर्भ म्हणजे काय? ४.गर्भ निर्माण कसा होतो? ५.गर्भामध्ये जीव कोणता आणि कसा प्रविष्ट होतो? ६. आधुनिक तंत्रज्ञानानुसार स्त्रीबीज आणि पुरुषबीज यांचा संयोग होऊन गर्भ कसा निर्माण होतो?
७. गर्भधारणा नंतर काय उपचार करावे? ८. आयुर्वेदानुसार मासानुमासिक आहार कसा असावा? ९. गरोदर असल्यास काय खावे आणि काय खाऊ नये?
१०. गरोदर असल्यास काय करावे आणि काय करू नये? याची इत्यंभूत माहिती आपण आज लेखात पाहणार आहोत. गर्भसंस्कार म्हणजे गर्भावर होणारे संस्कार म्हणजेच गर्भिणी जे दिवसभर करते आणि तिच्या आजूबाजूचे वातावरणाने गर्भावर जे संस्कार घडतात ते गर्भसंस्कार होत. हे संस्कार म्हणजेच परिवर्तन नकारात्मकतेतून सकारात्मकतेकडे नेणारे असावी. गर्भधारणेपूर्वी आयुर्वेदिक वैद्याच्या साहाय्याने उत्तम संतान प्राप्तीसाठी आयुर्वेदिक शोधन म्हणजेच पंचकर्म आणि शमन चिकीत्सा म्हणजेच औषधी पद्धतीचा अवलंब करणे महत्त्वाचे असते. गर्भ -"शुक्रशोणीत जीव संयोगे तू खलु कुक्षीगते गर्भ संज्ञा भवती!" उत्तम शुक्र, शोणीत आणि जीव यांच्या संयोगातून उत्तम गर्भ (संतान) उत्पत्ती होते. गर्भामध्ये जीव प्रवेशाचा श्रीमद् भगवद्गीतामध्ये उल्लेख आलेला आहे. त्यामध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात, "धिमताम् श्रीमतां घेये योगभ्रष्टतो अपि जायते! म्हणजेच योगी व्यक्ती संतान प्राप्ती फक्त योगी माता-पितांनाच प्राप्त होते. त्यासाठी माता-पितांनी देखील सदाचरण करणे अत्यंत महत्त्वाचे असते. आधुनिक शास्त्रानुसार स्त्रीच्या ऋतू काळामध्ये म्हणजेच फर्टीलाइज डे मध्ये ज्यावेळी पुरुष बीज आणि स्त्रीबीजाचा गर्भाशयामध्ये संयोग होतो आणि तो गर्भ गर्भशय्येंमध्ये हळूहळू रुजू लागतो अशावेळी तिला गर्भप्राप्ती होते. गर्भधारणेनंतर मातेच्या शारीरिक आणि मानसिकरित्या बदल घडून येतात. त्यासाठी काही संस्कार केले जातात किंवा काही औषधी योजना केली जाते. त्यामध्ये मासानुमासिक काढे दिले जातात, मासानुमासिक परिचर्या, आहार विहार योजना, पथ्य अपथ्य म्हणजेच काय करावे आणि काय करू नये, प्राणायाम, योगा, व्यायाम , प्रसावासाठी लागणारी तयारी याची माहिती दिली जाते. गर्भधारणेनंतर बालकाला रक्तपुरवठा मुबलक प्रमाणात कसा पूरवता येईल हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी आहारामध्ये विशेषतः प्रथम महिण्यामध्ये दुधाचा अधिक समावेश असावा. दुसऱ्या महिन्यामध्ये मधुर गणातील औषधी सिद्ध दुधाचा अधिक प्रमाण मध्ये आहारामध्ये समावेश असावा. तिसऱ्या महिन्यामध्ये दूध, मध आणि तूप यांचा आहारामध्ये अधिक समावेश असावा. चौथ्या महिन्यामध्ये दूध आणि लोणी यांचा आहारामध्ये अधिक समावेश असावा. पाचव्या महिन्यामध्ये दूध आणि तूप यांचा अधिक समावेश असावा. सहाव्या महिन्यामध्ये मधुर स्कंद औषधी सिद्ध दूध आणि तूप यांचा समावेश अधिक असावा. सातव्या महिन्यामध्ये दूध खीर याचा अधिक समावेश असावा. आठव्या महिन्यामध्ये क्षीर यवागू म्हणजेच तांदूळ आणि मूग यामध्ये अधिक पाणी घालून शिजवलेली खीर (यवागु) याचा आहारामध्ये अधिक समावेश असावा. गरोदर स्त्रीने अधिकाधिक द्रविभूत पदार्थांचा समावेश आपल्या आहारामध्ये करायला हवा. पाण्याचे प्रमाण या काळामध्ये अधिक असावे.
डाळिंब, नट्स म्हणजेच बदाम अक्रोड मनुका,शेंगदाणे हे पदार्थ अधिक खावेत.
गोड,स्निग्ध ,हृद्य, मनाला आवडणारे पदार्थ अधिक प्रमाणात घ्यावेत. परंतु वडापाव पाणीपुरी असे पदार्थ आवडत असल्यास हे मात्र अधिक प्रमाणात घेऊ नयेत. गरोदर स्त्रीने पपई, शेवगा, अननस, फणस, गवार, तोंडली,अधिक उष्ण, तिखट, खारट पदार्थ खाऊ नयेत.
उपवास करू नये. उपवास करायचे असल्यास राजगिरा, शिंगाडा ,भगर, आणि फलहार यांचा आहारामध्ये अधिक समावेश असावा. गरोदर स्त्रीने जाड वस्त्र धारण करू नये जाड दागिने देखील जड घालने टाळावे. अकाली जागरण म्हणजेच रात्री जागरण आणि दिवसा झोप घेऊ नये. उंचावरून खाली पाहू नये. ब्रह्मचर्या पालन करावे. हंसाप्रमाणे किंवा गजाप्रमाणे चालावे. आसन बसण्यासाठी मऊ असावे. शांत, पांढऱ्या रंगाचे वस्त्र परिधान करावे. लाल रंगाचे वस्त्र परिधान करू नयेत. पोटावर पाठीवर झोपू नये. डाव्या कुशीवर किंवा उजव्या कुशीवर झोपावे. त्यामध्ये देखील डाव्या कुशीवर झोपलेले उत्तम ठरते. दररोज प्रिय आणि आप्तजनांचे दर्शन घ्यावे. चांगली पुस्तके वाचावीत. संगीत ऐकणे हे देखील या अवस्थेमध्ये अधिक फायदेशीर ठरते. त्यामध्ये अहिरभैरव आणि याम्यम आहे हे राग सकाळी उठल्याबरोबर ऐकावेत. ओंकार मंत्र, गायत्री मंत्र सकाळी उठल्याबरोबर ऐकावे. संगीत ऐकणे ही देखील यामध्ये औषधी योजना पद्धती म्हणूनच काम करते. गरोदर काळामध्ये डोहाळे हे देखील पुरवले जावेत. त्यामध्ये जे हितकर डोहाळे असतात, ते अधिक प्रमाणात पुरविणे आणि अहितकर डोहाळे लागल्यास ते अल्प प्रमाणात पुरविणे हे फायदेशीर ठरते.
"देयांप्याहीतं तस्या हीतोपहीतं अल्पकम!"



**वैद्या ज्योती सचिन बन (गिरी),**
**श्री विश्वमाऊली आयुर्वेद चिकित्सालय आणि पंचकर्म, शॉप नं. 6, निशांत गार्डन, विश्वरूप हॉल शेजारी, कॉलनी नंबर 5, ज्योती नगर, छत्रपती संभाजी नगर.**
**संपर्क -9422901923**

# आहार व पंचकर्माद्वारे सांभाळा वर्षा ऋतूतील आरोग्य

कडाडलेल्या उन्हाचा त्रास सहन केल्यावर सर्वांना प्रतीक्षा असते ती पावसाच्या सुखवणाऱ्या पहिल्या सरीची. पावसाची पहिली सर अबाल वृध्द ना सुखावते हे खरे, पण आरोग्याचा विचार करता पावसाळ्यामध्ये सर्वांनाच आरोग्य रक्षणासाठी तत्पर राहायला हवे. उन्हाळा म्हणजेच ग्रीष्म ऋतु व पावसाळा म्हणजेच वर्षा ऋतू या दोन्हीही ऋतूमध्ये वातावरणात बराच फरक असतो. उन्हाळ्यात उष्णतेमुळे हवा कोरडी असते, तर पावसाळ्यात हवेत थंडावा असतो, उन्हाळ्यात तळपता सूर्य असतो तर पावसाळ्यात कधी कधी दिवसभरात एकदाही सूर्यदर्शन होत नाही व वातावरणातील वाढलेली आद्रता हे सर्व वातावरण कृमी व जंतूंना पोषक असते व यातूनच जंतू संसर्गजन्य विविध रोगराईचे प्रमाण बरेच वाढलेले दिसते. वर्षा ऋतूमध्ये खालील प्रमाणे शरीरात बदल होतातः-
१) वर्षा ऋतूतील आद्रता, थंड हवा, जमिनीतून निघणारी वाफ व आम्लपाकी जल यामुळे वात दोषाशा प्रकोप होतो आणि पित्तदोषाचा संचय( साठायला लागतो) होतो. २) धातूचा विचार करता वर्षा ऋतूत स्वाभाविकच धातूची शक्ती कमी होते. सर्वच धातू मलूल होतात. ३) वर्षा ऋतूतील वात प्रकोपामुळे मलावष्ठंभ होण्याची प्रवृत्ती वाढू शकते. ४) हवेतील दमटपणामुळे वातावरणात जंतूचे प्रमाण वाढते तर शरीर धातू मलुल झाल्याने शरीरातील रोग प्रतिकार शक्ती कमी होते. ५) वर्षा ऋतूत अग्निमंद होत असल्याने पचनही मंदावते. वर्षा ऋतु तील बदलामुळे खालील प्रमाणे संभाव्य व्याधी होऊ शकतात..... १) वर्षा ऋतुतील वात प्रकोपामुळे प्रामुख्याने संधिगत वात, कंबर दुखी, मान दुखी, संधी स्तब्धता, वातरक्त आदी व्याधी होण्याची संभावना जास्त असते. २) पित्तदोषाचा संचय (साठत असल्यास) होत असल्यास आम्लपित्त, शीत पित्त (आरटीकेरिया )आदी व्याधी होऊ शकतात. ३) वर्षा ऋतूमुळे उत्पन्न झालेल्या अग्निमांद्य मुळे अजीर्ण (इंडायझेशन), मलावष्ठंभ (कॉन्स्टिपेशन) अदि व्याधी होतात. ४) वातावरणातील जंतुसंसर्ग कमी झालेला अग्नी व शरीर बल यामुळे स्वाभाविकता रोगप्रतिकार शक्ती कमी होऊन अतिसार, उलट्या, सर्दी, खोकला आदी दूषित हवा व पाण्यातून व्याधी उत्पन्न होतात.
५) हवेतील आद्रता व दमटपणामुळे श्वास (अस्थमा) जास्त प्रमाणात उद्भवतो..... १) आहार २) आचरण 3) उपचार-उपचार दोन प्रकारचे 1)अभ्यंतर औषधी म्हणजे शमन चिकित्सा 2) पंचकर्म शरीरशोधन चिकित्सा वर वर्णन केलेल्या त्रिसूत्रीच्या माध्यमातून वर्षा ऋतूतील आरोग्य उत्तम प्रकारे सांभाळता येते.
१) आहार- वर्षा ऋतूत अग्नि मंद झालेला असतो त्यामुळे इतर ऋतूपेक्षा या ऋतू चार घास कमी घेणे योग्य असते. सकाळी नाष्टा-साडीच्या लाह्या व दूध नाचणीचे बिस्किट राजगिऱ्याच्या लाह्या व दुध मेतकूट भात तूप, तांदळाचे उकड यासारख्या पचण्यास हलके पदार्थ घ्यावे. दुपारचे जेवण-शक्यतो गरम पाणी घ्यावे कोळीयोजी ज्वारीची बाजरीची भाकरी तांदळाची भाकरी फुलका याच्यावर भर देणे चांगले. संध्याकाळचे जेवण-संध्याकाळी सहा ते आठ च्या मध्ये जेवण करावे. जेवणात मुगाची खिचडी, कडी भात, किंवा विविध भाज्यांचे हिंग ,आले ,जिरे टाकलेले सूप घ्यावे. वर्षा ऋतूत पाण्यामार्फत जंतुसंसर्ग होण्याची शक्यता जास्त असते त्यामुळे पिण्याचे पाणी उकळूनच घ्यावे. वर्षा ऋतूत घेण्यास योग्य आहारः-शरीरात कोरडेपणा वाढवणारे पाव चुरमुरे मैद्यापासून बनवलेले पदार्थ टाळावे.



चवळी पावटा वाटाणा ढोबळी मिरची गवार वांगे आधी पचण्यास जड व वात प्रकोपक आहार टाळावा. वर्षा ऋतू घेण्यास योग्य आहारः-सर्व धान्य भाजून घेतल्यास योग्य.
कडधान्य-मूग, मटकी, कुळीत, तूर, उडीद. भाजी-पडवळ, कारली, कोहळा गाजर ,तांबडा भोपळा, दुधी, तोंडली. मसाल्याचे पदार्थ - आले, हिंग, दालचिनी, धने, जिरे, मिरे, पुदिना, कोथिंबीर.
पावसाळ्यात अशा प्रकारे आहार घ्यावा व तब्येतीची काळजी घ्यावी....
पावसाळ्यातील आचरण व शमन व शोधन चिकित्सा क्रमशः पुढच्या लेख मध्ये...




# विहिरीत पडलेल्या हरणाला जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**बेलसर :** परिसरातील घटना संत ज्ञानेशवर महाराज आळंदी पंढरपूर पालखी मार्गांवरील पुरंदर तालुक्याच्या बेलसर भोंगळे मळा परिसरात असलेल्या महिंद्र कैलास हिंगणेबंधूच्या यांच्या ऐशी फूट खोल विहिरीत पाण्याच्या शोधात आलेले हरीण पडल्याचे स्थानिक शेतकऱ्याने जेजुरीतील समाजसेवक भगवानदादा डिखळे यांना कळविले. त्यांनी तातडीने वनविभागास काळविले आणि वनरक्षक पवार वनविभागाचे राहुल रासकर विशाल चव्हाण कोंळी आदिच्या सहाय्याने वनविभागातील साहसी युवक सागर शिरतोडे यांनी सुमारे ऐशी फूट कठेडे नसलेल्या विहरीत दोरीच्या सहाय्याने उतरून अल्पशा पाण्यात पडलेल्या हरणाला तीन तासाच्यानंतर जीवदान दिले. सध्या पाऊसच्या अभवा मुळे जयाद्री डोंगर परिसरातील हरणे अन्य प्राणी पाण्याच्या शोधात फिरत मनुष्य वस्ती आणि धोकादायक ठिकाणी फिरताना आढळून येत आहेत या परिसरात हरणांची संख्या लक्षनीय असून वनविभाग या प्राण्यांच्या संरक्षणा साठी प्रयत्नशील असते.






# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे डॉ. विश्वास आरोटे यांचा नांदेड येथे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** नांदेड येथील गुरुद्वारा बोर्ड तर्फे विशेष सन्मान महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ब्रँड अँबेसिडर संजय फुलसुंदर यांचा यावेळी शिरोपा तलवार मानपत्र शाल पुस्तिका देऊन सत्कार करताना गुरुद्वारा बोर्डचेगुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक ठाणसिंघ विश्ववस्त दमदमासाहिब गुरुद्वारा चे माजी प्रभारी हुकूम सिंग कराबिन, संचखंड गुरुद्वारा हुजुर साहिब मुख्य अधिक्षक थानसिंग बंगाई यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ अभयकुमार दांडगे. वृत्तवाहीनी संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजयकुमार कुलदिपके.. जिल्हा अध्यक्ष संग्राम मोरे. नांदेड जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष मोहन पाटील पवार, जिल्हा सचिव रुपेश पाडमुख, विभागीय संपादक हरणामसिंग चव्हाण.पत्रकार नाविद अहेमद दैनिक समर्थ गांवकरी जिल्हा प्रतिनिधी महादेव एडके,गणपत जामगे यासह अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांचा गुरुद्वारा बोर्ड समितीने भव्य सत्कार केला.

# जुन्या चाळीत सडलेला मृतदेह आढळला...!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील गल्ली नंबर 5 येथे एका बंद करा कुजलेला सडका मृतदेह आढळून आला आहे नेमकं हा मृतदेह कोणाचा व किती दिवसापासून अडकला आहे अद्यापही कळाले नाही. मृतदेह गल्ली नंबर 5 येथील चंपावती तारगे नावाच्या एक म्हाताऱ्या आजीबाई यांच्या जुन्या चाळीत एका बंद खोलीत लाकडी जिन्यात अडकला असून संपूर्ण शरीर कुजलेल्या अवस्थेत आहे. नागरिकांचा संशय असा आहे की कदाचित अज्ञात चोर चोरीच्या बहानाने आत गेला असेल व विद्युत तारेत किंवा लाकडी फळीत अटकला असून त्याला बाहेर येण्याचे साधन नसावे म्हणून आताच दम घुटल्याने मेला असेल अशी शंका निर्माण होत आहे गेल्या कित्येक दिवसापासून स्थानिक नागरिकांना याचा दुर्गंध येत असताना संपूर्ण परिसरात चर्चा होती.नेमके मृतदेह कोणाचे अजूनही कळालं नाही. पुढील तपास आझाद नगर पोलीस स्टेशनचे कर्मचारी करीत आहे करत आहे.





# तलवाडा येथे जागतिक योगदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज


**शांताराम मगर**

**वैजापूर :** तालुक्यातील तलवाडा येथील जिल्हा परिषद शाळा येथे जागतिकयोगदीन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. एक तास मुलांनीयोगा करून नियमितयोगप्राणायाम करण्याचा संकल्प केला. यावेळेस एखंडे म्हणाले योगा केल्याने बुद्धी आणि विचारांवर सकारात्मक परिणाम होतो. योगामुळे नकारात्मक विचार, तणाव आणि चिंता दूर होतात आणि मानसिक विकारांपासून व्यक्तीचे संरक्षण होते. नैराश्यात जाण्यापासून वाचवण्यासाठी योगा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. तसेचयोगा मुळे शरीर निरोगी रहाते, आळस निघुन जातो उत्साह वाढतो, स्मरणशक्ती वाढते त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमितयोगा करावा असे आवाहनयोग गुरु आजिनाथ बापुराव ऐखंडे यांनी केले. मोठ्या उत्साहाने मुलांनी गावातील ग्रामपंचायत गावकरी यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. योगदिनाची सुरुवात प्रार्थनेने करण्यात आली. 'आम्ही ध्येयाच्या दिशेने एकत्र जाऊ. आम्ही एकविचाराने राहू. एकच विचार बोलू. आमचे मन एक असो. पूर्वी देवानी एकत्र येवून मोठे यश मिळवले. तसे आम्हीही आमच्या एकत्रित प्रयत्नाने मिळवू. या अर्थाची प्रार्थना म्हणण्यात आली. यांच्या मार्गदर्शनानुसार जॉगिंग, घोटे, गुढगे, कंबर, हात, मान इत्यादीचे व्यायाम करण्यात आले. योगासानाला सुरुवात करण्यात आली. योगासनाच्या विविध आसनांमध्ये ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्धचक्रासन, त्रिकोणासन, भद्रासन, शशांकासन, अर्धउष्ट्रासन, मरीचायासन, सेतुबंध, पवनमुक्तासन, शवासन, भुजंगासन, शलभासन, मकरासन हे योगासनाचे विविध प्रकार करण्यात आले. असेच प्राणायामाचे कपालभाती, नाडीशुद्धी, भ्रामरी, ओंकार, ध्यानधारणा असे प्रकारही करण्यात आले. 'मनाच्या संतुलित अवस्थेत राहून सर्वोच्च स्वयंविकास साधण्याचा तसेच कुटुंब, कार्यालय, आणि समाजाप्रती, आपले कर्तव्य निभावण्याचा संकल्प करून योगासन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी शाळेचे सरपंच पुनम मगर हरिभाऊ मगर. ग्रामसेवक आर. आर. पवार, ज्ञानेश्वर मगर दादाभाऊ मगर शांताराम मगर रहिमखॉ पढण, सुभाष रोकडे, दत्तु मगर, आशिफ शेख, राजेंद्र गवांदे, किशोर मगर, तुपे सर काकासाहेब मगर, प्रकाश सोनवणे,पापा शेख, नारायण मगर रवि मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आंगठी सेविकासविता खरात.मंगल गांगुडे उषाताई सोनवणे, चंद्रकला सोनवणे यांना ग्रामपंचायतीच्या वतीने ऑनराईड मोबाईल देण्यात आले. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक संजय आहेर भोगावकर मॅडम, रौफ शहा सर, सय्यदा मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# योगविद्या अनमोल देणगी : आ. लोणीकर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** योग हा शब्द 'युज' या संस्कृत धातू पासून बनलेला आहे, ज्याचा अर्थ आहे आत्म्याचे परमात्म्यात विलीन होणे.



योग ही भारतातील पाच हजार वर्ष प्राचीन ज्ञानशैली आहे. पुष्कळ लोकांचा असा समज आहे की योगाभ्यास म्हणजे शारीरिक व्यायाम आहे, ज्यात शरीर ताणले, वाकवले, पिळले जाते आणि अवघड श्वसन प्रक्रियांचा अवलंब केला जातो. खरेतर मानवी मन आणि आत्मा यांची अनंत क्षमता जाणून घेणाऱ्या या विज्ञानाची ही म्हणजे योगाभ्यासाची केवळ वरवरची ओळख झाली. योगाभ्यासामध्ये जीवनशैलीचा परिपूर्ण सारांश प्राप्त होतो. योगविद्या आणि ध्यानधारणा ही आपल्या भारतीय संस्कृतीकडून अखिल विश्वाला लाभलेली अनमोल देणगी आहे. 21 जून हा दिवस "आंतरराष्ट्रीय योग दिवस" म्हणून साजरा करण्यात येणे ही सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद अशी घटना आहे. आणि आरोग्यसंपन्न जीवनशैलीसाठी योगाचे महत्व अधोरेखित केले जाते. याच पार्श्वभूमीवर जागतिक योगा दीना निमित्त यंदाच्या वर्षी modi@9 महा जनसंपर्क अभियाना च्या अनुषंघाने सामूहिक योगासन कार्यक्रमाचे आयोजन श्री श्री ज्ञानमंदिर वाटुर तालुका परतूर जिल्हा जालना करण्यात आले होते. या सामूहिक योगा कार्यक्रमाचे उदघाटन माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर साहेब यांच्या शुभहस्ते पार पडले या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की या परंपरेचा उल्लेख नारदीय सुक्त आणि सर्वात प्राचीन अश्या ऋग्वेदामध्ये आढळतो. हा आपणास पुन्हा सिंधू-सरस्वती सभ्यतेचे दर्शन घडवतो. या सभ्यतेमधील पशुपतीनाथांच्या एका नाण्यावर योगमुद्रा विराजमान आहे जी त्या काळातील योगाच्या व्यापकतेचे द्योतक आहे. अतिप्राचीन उपनिषद बृहद अरण्यक मध्ये योगामधील काही शारीरिक आसनांचा उल्लेख आढळतो. या प्रसंगी जलतारा प्रकल्प समन्वयक पुरुषोत्तमजी वायाळ, मंठा भाजपा तालुका अध्यक्ष सतीशराव निर्वळ, भाजपा जालना तालुकाध्यक्ष प्रकाश टकले, परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संभाजीराव वारे, गणपतआबा वारे, पद्माकर कवडे योग प्रशिक्षक गजानन वायाळ सर, घनश्याम वायाळ, उद्धवराव वायाळ, उमेश महात्मे, जगदीश पडुळकर, राजू आळणे, प्रकाश वायाळ, दिलीप वाघमारे यांच्यासह वाटूर परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते.

# ज्ञानकुंज महाविद्यालयात योग दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** 21 जून जागतिक योगा दिनानिमित्त ज्ञानकुंज कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय बाजार सावंगी येथे योगा विविध शैलीमध्ये शहराची मुद्रा, श्वास नियंत्रण, प्राणायाम ध्यान, इत्यादी योगा करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्रा. मनोज राणे, श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील, राहुल गायकवाड,भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव, श्रीमती नलावडे,पाचवने मॅडम, खान मॅडम,चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव, धुमाल बाबा यांची उपस्थिती होती.





# विद्यार्थी काँग्रेस तालुकाध्यक्षपदी विठ्ठल पाटील धोंडगे

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेस पक्षाचे सक्रिय यूवा कार्यकर्ते विठ्ठल पाटील धोंडगे याची अखील भारतीय विद्यार्थी काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष म्हणून फेरनिवड करण्यात आली आहे. #तालूक्यात गेली अनेक वर्षांपासून कॉग्रेस पक्षात सक्रिय सहभागी असलेले सामाजिक यूवा कार्यकर्ते श्री.धोंडगे यांनी अखील भारतीय विद्यार्थी काँग्रेस पक्षाचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी परिश्रम घेतले आहेत.विविध विधायक कार्यक्रम घेऊन जनजागृती केली आहे.पक्षाप्रतीअसलेली निष्ठा लक्षात घेऊन माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी अखील भारतीय विद्यार्थी काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष म्हणून फेरनिवड करण्यात यावी असा आदेश दिल्याने.भा.वि.काग्रेसचे जिल्हा अध्यक्ष शशीकांत निळकंठ क्षीरसागर यांनी सदरील फेरनिवडीचे लेखी पत्र दिले आहे. फेरनिवड होताच पंचक्रोशीतील विविध स्तरातुन अभिनंदन केले जात आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण आणि इतर पदाधिकारी यांनी माझ्यावर विश्वास ठेवून फेरनिवड केली आहे.यापुर्वि मी एकनिष्ठ राहून पक्षाला बळ देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली यापूढे या कामात कसलीच कूचराई न करता संवगड्याना सोबत घेऊन युवकांना प्रोत्साहन देऊन पक्षाची ध्येयधोरणे सामान्य तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी परिश्रम घेतले जाईल अशी ग्वाही श्री.धोंडगे यांनी दिली आहे.

# सिद्धार्थ महाविद्यालयात योग दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मिटमिटा येथील सिद्धार्थ महाविद्यालयात आज ( 21 जून ) जागतिक योगा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना धकाधकीच्या काळात आरोग्य संपन्न जीवनाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने योगा दिनाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनोहर वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना जीवनात योगाचे महत्त्व समजावून सांगितले. दररोज योगा केल्याने आपले मन, शरीर आणि आत्मा यांच्यात संतुलन साधता येते. नियमित योगा केल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्य राहते, असे डॉ. वानखेडे यांनी सांगितले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांकडून योगाचे विविध व्यायाम प्रात्यक्षिकासह करवून घेतले. या वेळी महाविद्यालयातील डॉ. राजू वानखेडे डॉ. सुकेशनी जाधव, डॉ. विनोद अंभोरे, राम जाधव, असीत शेगावकर, मोईन तडवी यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# फुलंब्रीत भाजपाच्या वतीने योग दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोदी@9 महाजनसंपर्क अभियान अंतर्गत आंतरराष्ट्रीय योगदिन शांतिनिकेतन विद्यालय, खुलताबाद रोड येथे साजरा करण्यात आला. यावेळी विविध योगासने करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय योग दिन हा दरवर्षी 21 जून रोजी जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी याला मान्यता दिली आहे. 21 जून 2015 रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला. योगदिनाचे औचित्य साधून फुलंब्री येथे शांतिनिकेतन विद्यालयात भाजपाच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष श्री. सुहास भाऊ शिरसाठ, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती सौ. अनुराधाताई चव्हाण, माजी जि. प. सदस्य श्री. शिवाजी महाराज पाथ्रीकर, श्री. जितेंद्र बाबा जैस्वाल, भाजपा तालुका योग दिन प्रमुख श्री. अभिषेक पा. गाडेकर, माजी प. स. सभापती श्री. सर्जेराव मेटे, भाजपा शहराध्यक्ष श्री. योगेश भाऊ मिसाळ, भाजपा महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा तथा माजी पंचायत समिती सदस्या सौ. ऐश्वर्या गाडेकर, सुशिलाताई फुके, योगशिक्षक कल्याणकर सर, गटशिक्षणाधिकारी पाटील साहेब, महाजन साहेब, वाल्मीक जाधव, अजय शेरकर, फारुख शेख, बाळासाहेब तांदळे, मयूर कोलते, अजय नागरे, आकाश गोरवणे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# शिवतेजने कराटे स्पर्धेत मिळविले सुवर्ण पदक

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव गावचे माजी सरपंच



आप्पासाहेब लोखंडे यांचा मुलगा शिवतेज लोखंडे हा सध्या पिलीव येथील कै.अमोल पिसे इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये इयत्ता आठवी शिकत आहे.सोलापूर तायक्वांदो स्पोर्ट कौन्सिल यांच्या कडून घेण्यात आलेल्या कॅडेट तायक्वांदो जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये शिवतेज याने प्रथम क्रमांक मिळवून गावाचे नाव गुणवत्ता यादीत झळकविले असून याअगोदरही त्याने वर्धा जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक मिळविला होता. एवढ्या लहान वयात शिवतेज याने सलग दोनवेळा सुवर्ण पदक मिळविले आहे. या यशामुळे मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शिवतेजची निवड झाली असून पिलीवसह परिसरातील विवीध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून शिवतेजवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मार्गदर्शक शिक्षक वाजीद शेख व आई-वडील यांच्या अनमोल मार्गदर्शनामुळे मी आज इथपर्यंत मजल मारली असल्याचे शिवतेज याने माध्यमांशी बोलताना सांगितले.

# वैभव सोनुनेला तब्बल दीड कोटींची शिष्यवृत्ती

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** घरची हलाखीची परिस्थिती मात्र, कितीही गरीबी, अडचणं असली तरी लेकराला शिकवायचं. त्यासाठी मोल मजुरी केली. शिक्षणासाठी लागणारा पैसा आणायचा कुठून ही अडचण उदभवल्याने वेळप्रसंगी अंगावरील दाग दागीने मोडले. परंतू मुलाला शिकविले. त्यानेही गरीबीची जाण ठेवून उपाशी पोटी राहून, मिळेल ते काम केले. हे सगळ बळं मिळालं ते बाबासहेबांच्या प्रेरणेतून, बाबासाहेब होता येणार नाही. परंतू त्यांचे विचार घेऊन रिसोड तालुक्यातील पेडगाव येथील गरीब कुटुंबातील वैभव सोनुने थेट ब्रिटनला पुढील शिक्षणासाठी जातोय, त्यासाठी त्याला नामांकित तीन वेगवेगळया विद्यापीठाकडून जवळपास दीड कोटींच्या शिष्यवृत्ती मंजूर झाल्या आहेत. बाबासाहेबांसारखंच माझं लेकरु पण विदेशात जात असल्याचा सार्थ अभिमान असल्याचे वैभवचे आई वडील यांनी सांगीतले. वैभवचे मुळ गाव रिसोड तालुक्यातील पेडगाव आहे. मात्र, घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामूळे त्याचे वडील नाशिक येथे बांधकाम मजूर म्हणून काम करुन कुटुंबाचा प्रपंच चालवित होते. अशातच २००१ मध्ये वडीलांचा अपघात झाल्यामूळे ते त्यांच्या पेडगावी परतले. वैभवचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले. तसेच संत सखाराम महाराज लोणी येथील आश्रम शाळेत शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेतील राज्यशास्त्र या विषयात प्रवेश घेतला. पुढे बैंगलोर येथे एम.ए. डेव्हलपमेंट या विषयावर शिक्षण पूर्ण केले आहे. घरची अत्यंत गरीबीची परिस्थिती असल्यामूळे वैभवला शिक्षणासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. परंतू राजुच्या वेळोवेळीच्या मागदर्शनामूळे वैभवने तयारी केली आणि त्याला चिवनिंग अवार्ड ही शिष्यवृत्ती युनिव्हरसिटी ऑफ लीडस मध्ये पर्यावरण व विकास याकरीता तर कॉमनवेल्थ शेयर्ड स्कॉलरशिप युनिवर्सिटी ऑफ लीडस मध्येच आणि कॉमनवेल्थ शेयर्ड स्कॉलरशिप युनिवर्सिटी ऑफ इस्ट एंजिया मध्ये शेती आणि ग्रामीण विकास या अभ्यासक्रमासाठी मंजुर झाली आहे. शिक्षण घेतांना आलेल्या अडचणीसाठी त्याचे शिक्षक, विद्यादान सहाय्यक मंडळ व काही सामाजिक संस्थांचा मोठा हातभार मिळाला.

# एसटी महामंडळ विरोधात युवक काँग्रेसचे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे विभागातील चालक व वाहक पदासाठीची २०१९ पासून प्रलंबित सरळ सेवा भरती प्रक्रिया तात्काळ सुरु करावी, वैद्यकीय चाचणी झालेल्या उमेदवारांची ट्रायल पूर्ण करून पुणे विभागाची अंतिम निवड यादी जाहीर करावी, प्रशिक्षण काळात गाड्यांची संख्या वाढवावी, या मागण्यांसाठी एसटीच्या विभागीय नियंत्रक कार्यालयाच्या आवारात पुणे शहर युवक काँग्रेसच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले.

पुणे शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या धरणे आंदोलनात वैद्यकीय चाचणी झालेले २५०-३०० उमेदवार, युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रभारी एहसान अहमद खान, पुणे शहर काँग्रेस प्रभारी विजयसिंह चौधरी, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रथमेश आबनावे, रोहन सुरवसे, प्रदेश सचिव राजू ठोंबरे, संतोष पाटोळे, वाहिद नीलगर, अक्षय माने, केतन जाधव, प्रसाद वाघमारे, अजित ढोकळे, मुरली बुद्धाराम, विकार शेख, रमेश कांबळे, सुजित गोसावी, आदिनाथ जावीर आदी उपस्थित होते. एसटी महामंडळाचे प्रभारी विभागीय नियंत्रक कैलास पाटील यांना या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

राहुल शिरसाठ म्हणाले, "एसटी महामंडळाने २०१९ मध्ये १२ विभागांची सरळ सेवा भरती प्रक्रिया राबविली. मात्र, पुणे विभागात वैद्यकीय चाचणी होऊनही ट्रायल न झाल्याने, तसेच ट्रायल ट्रॅक नसल्याने त्यांची भरती प्रक्रिया चार वर्षांपासून रखडली आहे. त्यामुळे ट्रायल लवकरात लवकर घेऊन ही भरती प्रक्रिया सुरु करण्याची मागणी नियंत्रकांकडे केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, येत्या ५ तारखेपासून ट्रायल सुरू करण्याचे आश्वासन विभागीय नियंत्रकांनी दिले आहे." शिरसाठ यांच्या पुढाकाराने या तरुणांना न्याय मिळाला, असे सांगत एहसान अहमद खान यांनी शिरसाठ यांचे कौतुक केले.

उमेदवार, पुणे विभागात १६४७ पदांसाठी ही भरती होती. अकरा विभागांची भरती पूर्ण झाली असून, पुणे विभागात ती रखडली आहे. ही भरती प्रक्रिया लवकर सुरु करावी, तसेच प्रशिक्षणासाठी बस उपलब्ध



कराव्यात, ट्रायल ट्रॅक सुरु करावा, मुलांच्या अंतिम याद्या जाहीर कराव्यात, यासाठी अनेकवेळा आंदोलन केले. आझाद मैदानावर केलेल्या उपोषणानंतर महाव्यवस्थापकांनी परिपत्रक काढले होते. मात्र, त्यावर कार्यवाही झाली नव्हती. युवक काँग्रेसच्या सहकार्याने आज केलेल्या आंदोलनामुळे विभागीय नियंत्रक कार्यालयाकडून ५ जुलैपासून भरती प्रक्रिया सुरु करण्याचे आश्वासन दिल्याने आम्हाला दिलासा मिळाला आहे.



# जीवे मारण्याचा प्रयत्न; एकास केली अटक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** दारू पिऊन भर रस्त्यात तरुणाच्या डोक्यात बियरची बाटली फोडून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या चार जणांविरूध्द वैजापूर पोलीस ठाण्यात गून्हा दाखल करण्यात आला होता. यात दोन जण फरार होते त्यातील एक आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. वैजापूर शहरातील गंगापूर रोड येथे अज्ञात कारणातून तरुणाच्या डोक्यात बिअरची बाटली फोडण्यात आली होती. या प्रकरणी 08 मे रोजी वैजापूर पोलिस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील दोन आरोपींचा जामीन मंजूर करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपी दिनेश शिंदे रा.रोटेगाव व सुदर्शन ऊर्फ गोट्या बहिरट रा.गायकवाड वाडी वैजापूर हे दोघे फरार होते. जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या फरार दोन आरोपी पैकी एकास पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया, अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार, सहाय्यक पोलीस अधीक्षक महक स्वामी मॅडम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे संजय घुगे, पोना अशोक वाघ यांनी फरार असलेला सुदर्शन ऊर्फ गोट्या बहिरट यास कोपरगाव तालुक्यातील शिरसगाव येथून शिफातीने अटक केली . याच प्रकरणातील मुख्य आरोपी दिनेश शिंदे हा कुख्यात गुंड असून त्याच्यावर खून, लुटमार, दहशत माजविने, खुनाचे प्रयत्न करणे, अग्नी शस्त्र बाळगणे अश्या प्रकारचे अनेक गंभीर गुन्हे असून तो अद्याप तरी मोकाट फिरत आहे. त्यास अटक करून कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या जनावरांची सुटका

## प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकाऱ्याची धडाकेबाज कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**निलकंठ कराड**

**शेवगाव :** प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक बी चंद्रकांत रेड्डी यांनी शेवगावच्या पोलीस ठाण्याचा प्रभारी पदभार स्वीकारल्यानंतर पहिलीच धडक कारवाई केली आहे तीन वाहनातून कत्तलीसाठी जाणाऱ्या बावीस गोवंश जनावरांची सुटका करून नऊ जणांना ताब्यात घेऊन त्यांना अटक करण्यात आली आहे पहिल्याच दिवशी धडाकेबाज कारवाई केल्याने बी चंद्रकांत रेडी यांचे शेवगाव तालुक्यातून कौतुक होत आहे

याबाबत सविस्तर राज्यात अशी की मंगळवार दिनांक २०रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास शेवगाव कडून आखेगाव कडे जाणाऱ्या वाहनातून कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक करण्यात येत असल्याबाबत ची माहिती शेवगाव पोलिसांना मिळतात प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक बी चंद्रकांत रेड्डी, पोलीस निरीक्षक विलास पुजारी, सहायक पोलीस निरीक्षक आशिष शेळके , सहायक पोलिस निरीक्षक विश्वास पावरा यांनी पथक तयार करून रस्त्यावरील डॉ. अमित फडके यांचे नवीन बांधकाम असलेल्या ठिकाणी रवाना झाले पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास त्या ठिकाणी एक वाहन शेवगाव कडून आखेगाव कडे जाताना आढळून आले त्यास थांबून त्यातील वाहन चालकाचे नाव विचारले असता त्याने अश्रफ रईस सौदागर, रा. खाटीक गल्ली, शेवगाव असे सांगून त्याच्या ताब्यातील टाटा एसी वाहन क्रमांक एम एच 14 सीडी ०० 21 व वाहनात बसलेले साहिल राजू कुरेशी, रा. दादेगाव रोड शेवगाव कैफ फय्याज सौदागर दादेगाव रोड शेवगाव मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेतले त्यानंतर दुसरे वाहन टाटा एसी एम एस 16 ए वाय 28 95 आले असता वाहन चालक सुनील बाबासाहेब चव्हाण राहणार वरुर व त्याच्या बरोबर असलेले असलेले बाबा मुसा शेख रा.खरडगाव ता.शेवगाव, आशिम फैयाज सौदागर दादेगाव रोड शेवगाव व त्यानंतर आलेले टाटा 407 क्रमांकाचे वाहन क्रमांक एम एच ०४ जी आर ५९१९ चालक फ्रान्सिस रामभाऊ चित्ते .खरडगाव, शेवगाव सोबत असलेले सुभान फारुक सौदागर इर्शाद अब्बास सय्यद खाटीक गल्ली शेवगाव यांना वाहनासह ताब्यात घेऊन वाहनातील एकूण 22 जनावरांना पोलीस ठाण्यामध्ये आणून व गोशाळेत पाठवून सुटका केली. याबाबत वरील इसमांनी त्यांचे ताब्यातील वाहनांमध्ये जनावरांना दाबून दाटीवाटीने बसून स्वतःचे फायदे करतात गोमांस खरेदी -विक्री करण्याच्या हेतूने वाहतूक करताना मिळून आल्याने आरोपीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा अधिनियम 1955 कलम 5 ( अ )( ब ) ९सह प्राण्यांचा प्रतिबंधक अधिनियम 1955 चे कलम ३,११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशिक्षणातील पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या पथकात पोलीस निरीक्षक विलास पुजारी पोलीस निरीक्षक विश्वास पावरा साहेब पोलीस निरीक्षक आशिष शेळके पोलीस नाईक रवींद्र शेळके पोलीस नाईक सुधाकर दराडे पोलीस पाटील राहुल खेडकर चालक पोलीस कॉन्स्टेबल पांडुरंग मावळ व पोलीस कॉन्स्टेबल सुनील रत्नपारखी पोलीस कॉन्स्टेबल संपत खेडकर चालक पोलीस कॉन्स्टेबल सुजित सरोदे पोलीस कॉन्स्टेबल वैभव काळे ही सहभागी झाले होते.

## डॉ.श्रीकांत आवारे यांनी स्वतः पदवीधर शिक्षक देऊन शाळेला दिली अनोखी भेट

आधुनिक केसरी न्यूज



**निफाड :** तालुक्यातील शिरवाडे वाकद येथील सरपंच डॉ.श्रीकांत आवारे यांनी विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वतः आर्थिक मदत देऊन जि.प.प्राथमिक शाळेत पदवीधर शिक्षकाची नियुक्ती केली आहे. त्याबद्दल पालक व विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. येथे सातवी पर्यंत प्राथमिक व ८ वी. ते १० वी माध्यमिक शाळा आहे. येथील माध्यमिक शाळेत सेमी इंग्रजी माध्यम असले तरी प्राथमिक शाळेत सहावी व सातवीच्या वर्गाला मंजूर पदवीधर शिक्षकाची जागा रिक्त आहे. त्यामुळे सहावी व सातवीचा वर्ग मराठी माध्यमात शिकवला जात असे. पदवीधर शिक्षकाअभावी माध्यमिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. ही बाब सरपंच डॉ.श्रीकांत आवारे यांच्या लक्षात येताच विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी त्यांनी तातडीने स्वतः आर्थिक मदत करून पदवीधर शिक्षकाची नेमणूक केली आहे. डॉ.आवारे यांनी तात्काळ कार्यवाही करून कृतीतून सकारात्मक संदेशही दिला. हे इंग्रजी विषयासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरणार असल्याने विद्यार्थ्यांची तसेच शालेय गुणवत्ता वाढून त्यांचा भविष्यातील पाया पक्का होण्यास हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे.

सरकारी शाळेतून गरीब विद्यार्थी शिक्षण घेतात . त्यामुळे प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षणाचा दर्जा चांगला रहावा हा आमचा आग्रह आहे . त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून मी पदवीधर शिक्षकाची नेमणूक केली असली तरी शासनाने याकडे लक्ष देऊन तातडीने शिक्षकांची रिक्त पदे भरावित .
**श्रीकांत आवारे, सरपंच, ग्रामपंचायत शिरवाडे**

## बकरी ईदनिमित्त बोकडाचे दर वाढले

आधुनिक केसरी न्यूज

**वडोदबाजार :** येथील सोमवारच्या आठवडे बाजारात बकरी ईदनिमित्त बोकड घेण्यासाठी मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने दिसत होते यामहिन्यात मुस्लीम समाज बांधवांचा बकरी ईद सन असल्यामुळें मुस्लीम समाज बांधव सोमवारच्या बाजार बोकड खरेदी करताना दिसत हेते तर मोठया प्रमाणात बोकड विक्री साठी आले होते . पन्नास हजार अंशी हजार रुपयांपर्यंत बोकडाचे दर होते.





## कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबवा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी दहावी आणि बारावीच्या परीक्षेत कॉपी मुक्त अभियान राबविले जावे तसेच तालुक्यांतील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील भौतिक सुविधांसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे असे निवेदन वैजापूर तालुका कृती समितीच्या वतीने उपविभागीय अधिकारी अरुण जऱ्हाड यांना देण्यात आले. नुकतेच रूजू झालेले उपविभागीय अधिकारी यांचा सत्कार करुन त्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तालुक्यांतील सर्वच शासकिय कार्यालयांना सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आदेश देणे. तसेच महाराजस्व अभियान अंतर्गत तालुक्यांतील सर्वच शिव रस्ते, शेत रस्ते आणि ग्रामीण रस्ते मोकळे करून मजबुतीकरण व खडीकरण करुन देण्याची मागणी समितीने केली. ऑनलाईन सात बारा नोंदी घेतांना झालेल्या चुकांची दुरुस्ती साठी महसुल मंडळ निहाय समाधान शिबिरे आयोजित करुन शेतकऱ्यांना मदत करावी तसेच वैजापूर तालुक्यातील भिजत पडून असलेला रोटेगांव औद्योगिक वसाहतीची जमीन अधिग्रहणाचा प्रश्न मिशन मोड मध्ये सोडवावा अशीही मागणी कृती समितीच्या वतीने करण्यात आली. समितीच्या वतीने विपिन साळे , गोकुळ सुरासे , ज्ञानेश्वर आदमाने, लक्ष्मण काळे पाटील, अर्जुन घोडके, संभाजी कलापुरे, नारायण कवडे, दामोदर पारिक, सुरज शिंदे , रामभाऊ पिल्दे यांच्या सहीने निवेदन देण्यात आले.

## रेल्वेखाली युवक-युवतीची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** अकोल्याहून बडनेराच्या दिशेने येणाऱ्या मालगाडीसमोर युवक-युवतीने आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली. मृत तरुणीची ओळख पटली असून युवकाची ओळख अद्याप पटलेली नाही.
राधा देवीदास पवार ( वय २०, रा. कोकर्डा ) असे मृत युवतीचे नाव आहे. अकोल्याहून बडनेराकडे मालगाडी येत असताना दुर्गापूर गावानजीक रेल्वेखाली युवक-युवतीने आत्महत्या केल्याची माहिती इंजिनचालकाने रेल्वे पोलिसांना दिली. जीआरपी आणि बडनेरा पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले.

पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता दोघांचे मृतदेह रेल्वेरुळाजवळ पडले होते. तरुणीच्या जवळील आधारकार्ड तसेच महत्त्वाच्या कागदपत्रांवरून तिचे नाव कळले. पोलिसांनी तिच्या नातेवाईकांशी संपर्क साधून त्यांना घटनेची माहिती दिली.

युवतीचा चुलतभाऊ बडनेरा ठाण्यात पोहोचला आणि त्याने युवतीची ओळख पटविली. रात्री ती घरी होती, परंतु मंगळवारी सकाळी कुठे गेली, याबाबत माहिती नसल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी युवकाची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.



# सोयगाव तालुक्यात रस्ते विनापरवाना खोदणाऱ्या शेतकऱ्यांनो सावधान

## अभियंता टाकसाळ : बांधकाम विभागाचा घ्यावा लागेल परवाना

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना पाईपलाईनसाठी रस्ता खोदला तर सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कडून शेतकऱ्यांना परवाना घ्यावा लागणार अशे निवेदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग फर्दापूर यांच्या वतीने अजय टाकसाळ उपविभागीय अभियंता,नितीन राठोड शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग फर्दापूर यांनी दि.३०/५/२३ रोजी फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि भरत मोरे यांच्या कडे लेखी निवेदन देण्यात आले आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत असलेले प्रमुख जिल्हामार्ग क्रमांक दोन अवैधरित्या पाईपलाईनचे खोदकाम केल्याबाबत चे लेखी निवेदन देण्यात आले आहे.सार्वजनिक बांधकाम उपविभाग फर्दापूर अंतर्गत असलेले आता नव्यानेच नवीन डांबरीकरण केलेल्या रस्त्यावर अज्ञात शेतकरी लोकांनी दहा ते पंधरा ठिकाणी शेतकऱ्यांनी जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम केलेले सार्वजनिक बांधकाम उपविभागाला आढळून आलेले आहे.सदर रस्ता प्रजिमा क्रमांक व प्रजिमा क्रमांक दोन या रस्त्यावर मार्च महिन्यात नवीन डांबरीकरणचा रस्ता तयार करण्यात आला होता परंतु डाभा,घाणेगांव तांडा, नांदा तांडा,सावळदबारा,देव्हारी, पिंपळवाडी गावाजवळ अज्ञात शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभागाची कुठलीही परवानगी न घेता प्रत्येक गावाजवळ पाझरतलाव सावळदबारा व चारुतांडा येथून पाईपलाईन लांबविल्या हाच पाईप लाईने असे दहा ते बारा ठिकाणी पाईप लाईन खोदकाम करून शेतात नेल्या आहेत ज्या ज्या रस्त्याच्या ठिकाणी पाईप लाईनचे खोदकाम करण्यात आले आहे त्या ठिकाणी आपण पाहणी करून अज्ञात शेतकऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येऊन गुन्हा दाखल करण्यात येणार यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी शेतात पाइपलाइन नेते वेळी कायदेशीर सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांच्याकडे परवाना घेण्यात यावा असे निवेदन फर्दापूर पोलिस ठाण्यात देण्यात आले आहे तरी शेतकऱ्यांनी रस्ता ची दक्षता घ्यावी जेणेकरून एसटी आणि स्कूलबसला व मोटारसायकल वाहनधारकांना पाइपलाइन च्या खड्ड्यांमुळे मोठी कसरत करावी लागते.

**पाईप लाईन करते वेळी परवाना घ्यावा :** शेतकऱ्यांनी देवळगांव गुजरी ते सावळदबारा आणि सावळदबारा ते गिरडाघाटाच्या पायाथ्यापर्यत पर्यंत पाईप लाईन खोदकाम करत असल्याचा परवाना सार्वजनिक बांधकाम उपविभाग फर्दापूर यांच्या कडून घ्यावा नाहीतर खोदकाम केल्यास त्याला तात्काळ बुजून सिमेंट माल टाकून क्रॉकेंट टाकून रस्ताची लेवल करून द्यावी नस्ता आता शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल होणार आहे .

**अजय टाकसाळ उपविभागीय अभियंता,**
**व नितीन राठोड शाखा अभियंता बांधकाम उपविभाग फर्दापूर**



# वैजापुरात विद्यार्थिनींनी घेतले योगासनाचे धडे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आजच्या मानवाला निरोगी, सक्षम, सुदृढ राहून मानवता टिकवायची असेल तर मानवी जीवनात योगासन, प्राणायाम व सूर्यनमस्कार करण्याशिवाय पर्याय नाही असे उदगार माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी योग दिनी बुधवार( ता.२१ ) दिनी पालिकेच्या मौलाना आझाद विद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या "योग जागृती"फेरीला ध्वज दाखविताना केले, फेरी नंतर त्यांनी शाळेत योगासन प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना व शिक्षकांना दाखवून त्यांच्या कडून योगासने व प्राणायाम करून घेतले. या वर्षीचे योग दिनाचे घोष वाक्य त्यांनी विद्यार्थ्यांना सांगून त्याप्रमाणे आचरण ठेवण्याचे आवाहन केले. या प्रसंगी मुख्याध्यापिका नीता पाटील,पर्यवेक्षक एम.आर.गणवीर,माजी मुख्याध्यापक जी.जी.राजपूत, योग शिक्षक बी.बी.जाधव, सुवर्णा बोर्डे, राजश्री बंड, सुनीता वसावे, लता सुखासे, ज्योती दिवेकर,पल्लवी भाकरे, श्रीमती घोलप, रावकर, संदीप शेळके, यांच्या सह शिक्षक वृंद व विद्यार्थी यांनी दीड तास योगासने शिकून त्याप्रमाणे कृती केली. शेवटी सुवर्णा बोर्डे यांनी आभार मानले.

# अध्यात्मातून मिळणारा आनंद सर्वोत्कृष्ट : अंधारे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** अध्यात्मातून मिळणारा आनंद हा स्वर्गीय आनंद असल्याने तो सर्वोत्कृष्ट असल्याचे मत बीड नगर पालिकेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांनी व्यक्त केले. बीड येथील रामतीर्थ नवा मोंढा रोड येथे आयोजित संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांचे आजोबा ब्र.गोविंदपंत महाराज यांच्या आषाढी वारी दिव्य रथ पालखी सोहळ्याच्या आगमनानिमित्त आयोजित किर्तन भजन व स्नेह भोजन सोहळा कार्यक्रमामध्ये त्यांनी प्रमुख उपस्थिती लावुन आपले मत व्यक्त केले.

आषाढी वारी दिव्य रथ पालखी सोहळा श्री क्षेत्र बीड ते पंढरपुरकडे पालखी प्रमुख ह.भ.प.सुग्रीव महाराज डाके यांच्या नेतृत्वाखाली रविवार दि.18 जुन दुपारी 1 वाजता मार्गस्थ झाली. पेठ बीड भागातील रामतीर्थ येथे महाराष्ट्र कला व सेवा प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा शैलाताई मुसळे आयोजित कीर्तन, भजन, सोहळा रंगला. दिव्य रथ पालखीचे स्वागत बीड नगर पालिकेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांनी आपल्या कुटूंबीयांसह केले. यावेळी कार्यक्रमाच्या आयोजक ह.भ.प.कमलाबाई मुसळे यांच्यासह पत्रकार संघाचे अध्यक्ष वैभव स्वामी, ज्येष्ठ पत्रकार व्दारकादास फटाले, श्रीकृष्ण मुंदडा यांच्यासह अन्नदाते योगिता मुसळे, सोनाली सोनवणे, मीराबाई आंधळे, आशाबाई आनेराव, झंवर भाभी, जयश्री दुबे, जयश्री मुसळे, लक्ष्मी टिके, जुगलकिशोर रांदड, बाबु वारेकर, अंजली नन्नवरे, संगीता दुबाले, बाळु महाराज यांनी पालखीतील वारकऱ्यांचे मोठया उत्साहात स्वागत केले. यानंतर स्नेह भोजनाने दिव्यरथ पालखी सोहळ्याचा समारोप होवून पालखी पुढे ह.भ.प.कमलाबाई, नवीन विठ्ठल मंदिर नवा मोंढा बीड येथून पंढरपुरकडे प्रस्थापित झाली. प्र



# शिवाजी विद्यालयात योग दिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे जय कलंका देवी शिक्षण संस्था संचलित शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा येथे योगाचा प्रचार व प्रसार वाढवून योगमय विद्यार्थीनी लाभ घ्यावा वातावरण निर्माण व्हावे तसेच योगदिनाची जागृती करुन आरोग्य सुदृढ कसे राखता येईल. यांची विद्यार्थी व शिक्षकवृ जनजागृती करण्यासाठी दि. २१ जून २०२३ या दिवशी शिवाजी विद्यालयात मध्ये जागतिक योगदिन साजरा करण्यात येणार आला जागतिक योग दिनाला प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यालयात अखत्यारीत येत असलेल्या सर्व विद्यार्थीमध्ये वास्तव्यास आलेल्या विद्यार्थ्यांना एकत्रितपणे काही वेळ योगासने करण्यावर भर देण्यात आली. तसेच विद्यार्थी शिकत व असलेल्या प्रत्येक शिक्षकवृंद वर्गाने योगाचा अंतर्भाव आपल्या दैनंदिन जीवनामध्ये करावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत, असे मार्गदर्शन प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील केले. भारतीय प्राचीन संस्कृतीमध्ये योगसाधनेला अनन्य साधारण महत्व आहे. आजच्या आधुनिक काळात प्रचंड धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगामध्ये शरीर निरोगी ठेवण्यासाठी आपल्या देशात व जगभरामध्ये योगसाधनेचे, योगाचे पालन करणे आवश्यक आहे. मानव जातीचे दीर्घ आयुष्य दर्शविणारा दिवस म्हणजेच वर्षभरातील सर्वात मोठा दिवस म्हणून गणल्या जाणाऱ्या २१ जून रोजी संपुर्ण जगभरामध्ये जागतिक योग दिन साजरा केला जातो. शारिरीक व मानसिक अनारोग्याचे निवारण करणे अत्यंत महत्वाचे असुन २०२३ यावर्षीच्या जागतिक योग दिनाचे औचित्य साधून शरीर आणि मन सुदृढ करण्यावर भर देण्यात येणार आहे. विद्यार्थी व शिवाजी विद्यालय परिसरातील स्थानिक स्तरावरील योग प्रशिक्षण संस्थेस किंवा व्यक्तीस शिवाजी विद्यालयात बोलवुन वास्तव्यास येणाऱ्या विद्यार्थ्यांना योगाचे जीवनामधील महत्व, योगाचे प्रकार, योग केल्याचे शरीरास त्याचा होणारा फायदा तसेच आजच्या धकाधकीच्या व धावपळीच्या जीवनात मनाच्या एकाग्रतेसाठी योग किती गरजेचे आहे हे एखादया व्याख्यानाव्दारे पर्यटकांना पटवून देण्याबाबत प्रयत्न करण्यात येणार आहेत. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगासनांना त्यांच्या जीवनशैलीचा भाग बनवण्याचे तसेच सर्वांचे आरोग्य सुधारण्याकरिता प्रत्येकाने नियमितपणे योगाभ्यास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील यांनी केले.या कार्यक्रमाचे प्रशिक्षक भास्कर खमाट यांनी योगाभ्यास देऊन केलेयावेळेस शाळेतील विकास पाटील विजयसिंग राजपूत , भूषण देसले, सुदाम राठोड, भास्कर ससाणे, श्रीकृष्ण सोनवणे,ज्ञानेशर राठोड,पोपटराव सोनवणे,संजय् जोशी,मुकुंदा व्यवहारे, गणेश मोहने,पंजाबराव शेळके इतर सूत्रसंचालन प्रा. जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी केले

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर